महाराष्ट्राची बित्तंबातमी!

# गुहागर सत्ता

GUHAGAR SATTA

संपादक : योगेश रघुवीर होळंब

PRGI NO. MHMAR/25/A0557

MUMBAI, VOLUME : 01, ISSUE : 09, WEEKLY : WEDNESDAY, 30 JULY 2025 TO TUESDAY, 5 AUGUST 2025, PAGE : 06, RS.3/-

guhagarsatta.com epaper.guhagarsatta.com editor.guhagarsatta@gmail.com 8879911127



महाराष्ट्राची कर्तृत्वान लेक नागपूरची इंटरनॅशनल मास्टर दिव्या देशमुख यांनी जोर्जिया येथे पार पडलेल्या FIDE बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत जेतेपद मिळवले आहे. तसेच दिव्या आता २०२६ मध्ये होणाऱ्या महिला कॅंडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्र ठरली असून तिनं आपला पहिला ग्रॅंडमास्टर नॉर्मही मिळवला आहे. या ऐतिहासिक विजयासाठी दिव्याचे अभिनंदन !!! या स्पर्धेचे जेतेपद मिळणारी दिव्या पहिली भारतीय महिला ठरली आहे हे विशेष. आपल्या देशासाठी आणि बुद्धिबळ क्षेत्रासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. दिव्याच्या या सुवर्ण कामगिरीने सर्व भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. दिव्याचे पुनःश्च अभिनंदन आणि पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी खूप खूप शुभेच्छा !!!

– श्री. योगेश रघुवीर होळंब, संपादक

## शासनाची मासेमारीस बंदी; तरी समुद्रात मासेमारी कशी?

## खांदेरी किल्ल्याजवळ मच्छिमारीसाठी गेलेल्या 'तुळजाई' बोटीला जलसमाधी

**मुंबई** : पावसाळ्यात वातावरण व समुद्र स्थिती खराब होत असल्याने १ जून ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत प्रवासी वाहतूक व मासेमारीस शासनाकडून दरवर्षी बंदी घातली जाते. त्यामुळे समुद्रातील प्रवासी वाहतूक व मासेमारीस बंदी असते. तरीही दरवर्षी काही मच्छिमार हे या बंदी काळात जीवावर उदार होऊन शासन आदेश डावलून मासेमारीसाठी जातात. त्यात त्यांना समुद्रातील अपघाताला सामोरे जावे लागते. यात मनुष्यहानी नेहमी होते. नुकतीच खांदेरी किल्ल्याजवळ मच्छिमारीसाठी गेलेल्या 'तुळजाई' बोटीला खडकाला आपटून जलसमाधी मिळाली. त्यात ८ खलाशी होते त्यापकी ५ खलाशी ९ तास पोहत किनाऱ्यावर आले व ३ जणांना आपला जीव गमवावा लागला. याला कोण जबाबदार असा प्रश्न सर्वांना पडला आहे?



शनिवारी दिनांक २६ जुलै रोजी शासनाने समुद्रात लाल बावटा लावून धोक्याचा इशारा दिला होता. तरी देखील उरण करंजा येथील मनोज गणपत कोळी यांच्या मालकीची ह्यतुळजाई नावाची बोट (IND MH 7MM 1405) २६ जुलै रोजी सकाळी सातच्या सुमारास करंजा बंदरातून मासेमारीसाठी निघाली होती. खांदेरी किल्ल्यानजीक समुदात लाटाच्या जोरदार पहारामुळे बोट पलटी होऊन जलसमाधी मिळाली. बोटीत एकूण ८ खलाशी होते.

बोटीतील पाच मच्छीमार हेमंत गावंड (आवरें), संदीप कोळी व टीशन कोळी (करंजा), शंकर भोईर व कृष्णा भोईट (आपटा, पनवेल) हे ९ तास पोहत किनाऱ्यावर आले होते. घटनेची माहिती मिळताच मांडवा पोलीस आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले.

पोहत आलेल्या ५ जणांना अलिबाग जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मांडवा पोलीस समुद्रात बुडालेल्या ३ जणांचा पोलीस शोध घेत होते. अखेर तब्बल ५० तासांच्या शोधानंतर मंगळवारी सकाळी तिघांचे मृतदेह सापडले. नरेश राम शेलार, धीरज कोळी (रा. कासवला पाडा, उरण) आणि मुकेश यशवंत पाटील (डा. करना, उरण) अशी मृत मच्छीमारांची नावे आहेत. तिघांचे मृतदेह अनुक्रमें सासवणे, दिघोडे व किहीम किनाऱ्याजवळ आढळले, अशी माहिती पोलिसांनी दिली.

संपूर्ण कोकण परिसरात हा शासनाचा प्रवासी वाहतूक, मासेमारीस बंदी आदेश सक्त काटेकोरपणे पाळला जातो. मात्र रायगड जिल्ह्यातच या आदेशाला केराची टोपली दाखवली जाते. त्यामुळे अशा दुर्घटना घडतात. तर प्रशासन या घटनांकडे कसे पाहत आहे? याची रत्न ागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मासेमारी लोकांमध्ये प्रचंड संताप पहावयास मिळत आहे. आता प्रशासन काय कायदेशीर कारवाई करणार याकडे सर्वांच लक्ष लागून राहिले आहे.

## विशेष वृत्त :

### शीर गावातील तलाठीच्या हलगर्जी-पणामुळे शेतकऱ्यांचे सातबारे कोरेच

**गुहागर** : गुहागर तालुक्यातील शीर तलाठी कार्यालयामध्ये कायमस्वरुपी तलाठी सेवेत रुजू नसल्यामुळे शीर मधील शेतकऱ्यांचे सातबारे वर्षानुवर्षे तलाठी कार्यालयात धूळ खात पडले आहेत. अनेक शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता येत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे सूर उमटलेले पाहायला मिळत आहेत. अशाच शेतकरी श्री अनंत तानाजी डावल आणि श्री रविंद्र तानाजी डावल राहणार शीर धारेवची डावल वाडी हे दोन्ही सख्खे भाऊनी आपली वडिलोपार्जित असलेली जमीन नावे होण्याकरिता पुर्वी चुकीची नोंद झालेली होती त्या चुकीची नोंद बदलण्याकरिता फेरफार दुरुस्ती साठी प्रांताचीकडे अपील केलेले होते. प्रांतानी तलाठीना आदेश देऊन फेरफार दुरुस्ती करून नोंद घालण्यात यावी लेखी कळविले. परंतु या प्रकरणाला तीन वर्षे होऊन गेली तरी तलाठी महोदयांनी नोंद हि अद्याप घातलेली नाही.

### पहलगाम हल्ल्यातील 3 दहशतवादी ठार; अमित शाह यांची लोकसभेत माहिती

**नवी दिल्ली** : पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६पर्यटकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारतात पाकिस्तान विरोधात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर भारतीय सैन्यानं 'ऑपरेशन सिंधूर' रावबत पाकिस्तानमधील अनेक दहशतवादी ठिकाणं उडवली होती. यात जवळपास 100 हून अधिक दहशतवादी ठार केले होते. मात्र, पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मुख्य दहशतवादी मोकाट असल्यानं संताप व्यक्त करण्यात येत होते. तशी टीकाही विरोधकांनी सरकारवर केली होती. अखेर सोमवारी (28 जुलै) भारतीय सैन्यानं या हल्ल्यातील तीन मुख्य दहशतवाद्यांना ठार केल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी लोकसभेत दिली.


### मी पोलिसांच्या विरोधात बदनामीचा दावा दाखल करणार, एकनाथ खडसे कडाडले

**पुणे** : पुण्यात मंगळवारी ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी एकनाथ खडसे म्हणाले की, पुणे पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी एका रेव्ह पार्टीवर छापा टाकत एकनाथ खडसे यांच्या जावयाला अटक केली. पोलिसांना माझे काही प्रश्न आहेत की रेव्ह पार्टीची व्याख्या काय आहे. याला रेव्ह पार्टी म्हणता येते का? तिथं ना डान्स होता, ना म्युझिक होती. विनाकारण आम्हाला बदनाम केलं जात आहे का? कारण पोलिसांनी खासगी ठिकाणाचे व्हिडीओ काढून ते माध्यमांना दिले हे पोलिसांनी बदनामी करण्यासाठी केलेलं कृत्य आहे.

नाशिकमध्ये बलात्काराची घटना घडली आहे, तिथं शासनाकडून एवढी तत्परता दाखवली जात नाही. हे सगळं प्लॅन करून खडसे यांना बदनाम केलं जात आहे. पोलिसांनी व्हिडीओ काढून माध्यमांना दिले कसे? याची सखोल चौकशी व्हावी, अशी आमची मागणी आहे. तसेच काहीही झालं तरी सत्य समोर येणार आहे. आमचा लढा हा चालू राहणार आहे. हनी ट्रॅपबाबत सरकार का उत्तर देत नाही, तसेच सरकार त्या सीडीबाबत उत्तर का देत नाही. या प्रकरणानंतर मी पोलिसांच्या विरोधात बदनामीचा दावा दाखल करणार आहे, असंही यावेळी खडसे म्हणाले.

## पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची गणेशभक्तांकडून होतेय मागणी

**ठाणे [अविनाश निश्चित]** : गणेशोत्सवाची तयारी सुरू होत असताना, घरगुती गणेशोत्सवासाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्तींना नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. पारंपरिक शाडूमातीबरोबरच यंदा इतर नैसर्गिक साहित्य वापरून तयार करण्यात आलेल्या मूर्तींचा पर्याय उपलब्ध झाला आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि पाण्याचे प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने नागरिक अधिक जागरूक झाले असून, पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची मागणी वाढत असल्याची माहिती ठाणे शहरातील काही गणेशमूर्तिकारांनी दिली.



प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) बंदीचा विषय गेले अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपुरक बनवण्यावर भर दिला जात होता. त्यानुसार, जलस्त्रोतांचे होत असलेले प्रदुषण लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) गणेशमूर्तींवर बंदी घातली होती. परंतू, यानिर्णयामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि गणेश मुतीर्कारांनी नाराजी व्यक्त केली होती. अखेर ९ जून ला प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी)च्या गणेशमुर्तीवरील बंदी उठवली. या निर्णयामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासह गणेशमुतीर्कारांना देखील काहीसा दिलासा मिळाला.

परंतू, प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) मूतीर्मुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांविषयी सातत्याने होत असलेल्या चर्चा आणि जनजागृतीमुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जागृकता निर्माण झाली आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षी घरगुती गणेशोत्सवासाठी पर्यावरणपूरक गणेशमुर्तींना मोठ्याप्रमाणात

(उर्वरित पान २ वर)

## कोकणात गणपती सणाला येणाऱ्या चाकरमान्यांचे खड्डयांनी होणार स्वागत!



**चिपळूण (श्रीकांत कांबळी)** : मुंबई गोवा हायवे चे काम गेले अनेक वर्ष संथ गतीने सुरू आहे. त्याचा फटका यावर्षीही मुंबईसह इतर शहरातून कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांना बसणार आहे. मुंबई-गोवा महामार्गावर पावसामुळे ठिकठिकाणी खड्डयांच्या साम्राज्याचे जाळे पसरल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे चाकरमान्यांना कसरत करीत प्रवास करावा लागणार आहे. तसेच रस्त्यांची अवस्था पाहता अपघाताची शाश्वती टाळता येत नाही. चिपळूण मधील सामाजिक कार्यकर्ते यांनी त्यावर आवाज उठविला असता सार्वजनिक बांधकाम विभाग व हायवे ठेकेदार यांच्याकडून तात्पूर्ती

(उर्वरित पान २ वर)

## सरकारी कर्मचाऱ्यांना सोशल मीडिया वापरासाठी नवे नियम लागू



**मुंबई [रणजीत गुरव]** : राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सोशल मीडियाचा वापर करण्याबाबत नवे मार्गदर्शक नियम जाहीर केले असून त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. डिजिटल युगात सोशल मीडिया हे संवादाचे प्रभावी साधन असले तरी त्यातून गोपनीय माहितीचा प्रसार, खोटी माहिती पसरवणे, तसेच शासकीय नियमांचे उल्लंघन होऊ नये याकरिता मार्गदर्शक तत्त्वे आखण्यात आली आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ हे सोशल मीडियाच्या वापराबाबतही लागू

(उर्वरित पान २ वर)

## हातखंबायेथील वळणावर एलपीजी गॅसने भरलेला टॅंकर दरीत कोसळला; चालक गंभीर जखमी

### रत्नागिरी पोलिसदलाकडून अचूक समन्वयामुळे मोठा अनर्थ टळला



**रत्नागिरी (राधा लवेकर)** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील हातखंबा शाळेजवळील धोकादायक वळणावर सोमवारी (२८ जुलै) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास एलपीजी गॅसने भरलेला एक टॅंकर २५ फूट खोल दरीत कोसळल्याने खळबळ उडाली. अपघातामुळे टॅंकरमधून गॅसची गळती सुरू झाली आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या भीषण अपघातात टॅंकर चालक गंभीर जखमी झाला असून, त्याला तात्काळ जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज यांच्या नाणीज संस्थेच्या रुग्णवाहिकेने रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती आहे.

अपघाताची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र यादव सहकाऱ्यांसह

(उर्वरित पान २ वर)

## रक्षाबंधनाच्या निमित्त 'एक राखी, एक देश'चा सशक्त संदेश!

### परशुराम एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांचा देशभक्तीचा आगळावेगळा उपक्रम



**चिपळूण (रूपाली भाटिया)** : परशुराम एज्युकेशन सोसायटीच्या युनायटेड इंग्लिश स्कूल व सुरेश दामोदर गद्रे इंग्लिश मीडियम स्कूलने रक्षाबंधनाच्या निमित्ताने देशभक्तीचा सशक्त संदेश देणारा आगळावेगळा उपक्रम यशस्वीपणे राबवला. 'एक राखी, एक देश' या संकल्पनेखाली सहाशे विद्यार्थ्यांची भव्य रॅली काढण्यात आली. युनायटेड इंग्लिश स्कूलपासून चिपळूण मुख्य पोस्ट ऑफिसपर्यंत काढलेल्या या रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार केलेल्या राख्या देशभरातील भारतीय जवानांसाठी पाठवण्यात आल्या.

(उर्वरित पान २ वर)

## रत्नागिरीतील मच्छी विकणाऱ्या महिलेची मुलगी झाली मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी

**ठाणे [आकांक्षा नार्वेकर]** : रत्नागिरी शहरातील भगवती बंदर परिसरात राहणाऱ्या मच्छी विकणाऱ्या महिलेची कन्या संजना सारंग यां स्पर्धा परीक्षेत सुयश मिळवत मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी झाल्या आहेत. नुकताच संजना सारंग यांनी ठाणे जिल्ह्यात वाडा पोखरण येथे मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी या ह्यबह्ल गटातील अधिकारपदाच पदभार स्वीकारला आहे.

संजना सारंग यांनी २०१२ मध्ये मत्स्य अभियांत्रिकीच्या पदविकेसाठी प्रवेश घेऊन २०१८ मध्ये मत्स्य विज्ञानाची पदवी प्राप्त केलेली आहे. संजना



सारंग यांचे वडील सुरेश सारंग यांची मुलीन पद्व्युत्तर शिक्षण घ्यावं खूप इच्छा होती. म्हणून संजना सारंग यांनी २०२० साली मत्स्य प्रक्रिया तंत्र या विषयात पद्व्युत्तर शिक्षण पूर्ण केल. वडिलांची पद्व्युत्तर शिक्षणाची इच्छा पूर्ण केली. पण, आनंद साजरा करण्यासाठी वडील हयात नसल्याने त्यांना त्यावेळी फार वाईट वाटले.

संजना सुदेश सारंग यांनी विद्यार्थी वगार्ला एक संदेश दिला आहे कि, प्रत्येकाने अकरावी पासुनच ध्येय निश्चित केले पाहिजे. मोबाईल बाजूला ठेवून अभ्यास केला पाहिजे. स्पर्धा परीक्षा देण्याची तयारी खूप अगोदर पासून सुरु केली पाहिजे. म्हणजे, यश निश्चित मिळेल. विद्यार्थ्यांनी उत्तम भवितव्यासाठी परिश्रम केले पाहिजेत. आपल्या करिअर बाबत गांभीर्यपूर्ण यांनी विचार करून अभ्यास केला पाहिजे. इयत्ता अकरावीपासून स्पर्धा परीक्षांची दिशा निश्चित

(उर्वरित पान २ वर)

## संपादकीय..

# बुडीत कर्जाची धोकादायक परंपरा !

संसदेत चालू असलेल्या पावसाळी अधिवेशनात अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी राज्यसभेत 'मागील १० वर्षांत सरकारी बँकांनी १२ लाख ८ सहस्त्र कोटी रुपयांचे कर्ज बुडीत काढले', अशी अतिशय गंभीर माहिती दिली. या कर्जाची रक्कम पुन्हा मिळण्याची शक्यता अल्प असल्याचेही पंकज चौधरी यांनी नमूद केले. बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया आदी प्रथितयश बँकांचा यामध्ये समावेश आहे. कर्ज बुडवणारे ९ आरोपी परदेशात पळून गेल्याची माहितीही पंकज चौधरी यांनी त्यांच्या भाषणात दिली. ही केवळ सरकारी बँकांची स्थिती आहे; मात्र देशातील खासगी बँका, सहकारी बँका, को-ऑपरेटिव्ह बँका यांमध्ये मागील काही वर्षांत घोटाळे पुढे आले, त्यावरून बुडीत कजार्ची रक्कमही कोट्यवधी रुपयांच्या घरात असेल, हे सांगायला कुणा तज्ञाची आवश्यकता नाही. बुडीत कजार्मुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील दूरगामी परिणाम अर्थात महागाई वाढ, करवाढ आदी येनकेन प्रकारेण देशवासियांना बसणारा फटका हा एक स्वतंत्र विषय ठरेल; मात्र मागील काही वर्षांत बुडीत कर्ज आणि बँकांचे घोटाळे हे देशाच्या आर्थिक स्थितीविषयी प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहेत. जी कर्जे बुडीत घोषित करण्यात आली, त्यामध्ये कर्जाचे हप्ते भरता येत नाहीत. त्यामुळे परदेशात पळून गेलेले धनाढ्य, स्वतःच्या लाभासाठी कर्ज घेऊन त्याचा अपलाभ घेणारे सहकारी बँकांचे पदाधिकारी, सहकारी सोसायट्यांचे मालक यांचा भरणा अधिक आहे. भ्रष्टाचार, आर्थिक घोटाळे, सर्वसामान्य गरीब लोकांच्या पैशांवर डल्ला मारून स्वार्थ साधण्याची ही दुष्प्रवृत्ती देशासाठी अतिशय घातक आहे. स्वतःला चैन-विलासी जीवन जगता यावे, यासाठी भ्रष्टाचार करून पैसा मिळवायचा, हा पैसा भलेही रोजंदारीतून बँकेत बचत करर्णाया गरिबांचाही का असेना, तो हडप करून पसार होणारी ही वृत्ती देशासाठी हानीकारक आहे.'आयसीआयसीआय बँके'च्या अध्यक्षपदावर असतांना चंदा कोचर यांनी 'व्हिडिओकॉन समूहा'ला १ सहस्त्र ७३५ कोटी रुपयांचे कर्ज दिले. वर्ष २००९ ते २०११ मध्ये हा प्रकार घडला होता. अध्यक्षपदाचा गैरवापर करून व्हिडिओकॉनला कोट्यवधी रुपयांचे कर्ज संमत करून त्या बदल्यात स्वतःचा आर्थिक लाभ करून घेणारे चंदा कोचर आणि त्यांचे पती दीपक कोचर यांना केंद्रीय अन्वेषण यंत्रणेने कह्यात घेतले अन-यात सहभागी असलेले 'व्हिडिओकॉन समूहा'चे मुख्य वेणूगोपाल धूत यांनाही अटक झाली. वर्ष २०१८ मध्ये निवृत्त न्यायमूर्ती बी.एन्. श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आणि वर्ष २०१९ मध्ये या तिघांच्या विरोधात गुन्हा नोंदवून वर्ष २०२२ मध्ये या तिघांना अटक झाली. यापूवीर्ही उद्योजक विजय मल्ल्या, हिरे व्यापारी नीरव मोदी, मेहूल चोक्सी यांनी बँकांकडून कोट्यवधी रुपयांचे कर्ज घेऊन परदेशात पलायन केले. त्यांच्याकडून काही प्रमाणात पैसे वसूल करण्यात सरकारला यश आल्याची वृत्ते अधूनमधून प्रसिद्ध होत असतात. मुळात बुडव्यांकडून पैसे वसूल करण्याच्या कामगिरीला यश म्हणणे, हीच अगतिकता आणि देशाची नाचक्की आहे. कोचर दांपत्य असो वा परदेशात पसार झालेले उद्योगपती असोत, हे बँकेमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात घोटाळे करू शकले, याला काही प्रमाणात बँकांतील अधिकारीही तितकेच उत्तदायी ठरतात.केंद्रीय अर्थराज्यमंत्री बुडीत कजार्ची आकडेवारी घोषित करतात, तेव्हा त्यावरील उपाययोजनांकडेही तेवढ्याच गांभीर्याने पहायला हवे. बुडीत कजार्ची कोट्यवधी रकमेची आकडेवारी देशाची पोलीस यंत्रणा, न्यायव्यवस्था आणि बँकिंग क्षेत्र यांच्या विश्वासार्हतेची लक्तरे वेशीवर टांगणारी आहे. बँकांमध्ये आर्थिक शिस्त टिकून रहावी, यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकांना जी नियमावली दिली आहे, तिला बगल देऊन बँकांकडून कोट्यवधी रुपयांची कर्जे दिली जातात. कर्ज देतांना तारणाची खात्री केली जात नाही. काही उद्योजक कर्ज स्वतःच्या नावावर घेतात; परंतु त्यांचे हप्ते वेळेत भरत नाहीत, तेव्हा त्याच वेळी बँकांकडून कठोर कारवाई केली जात नाही. बुडीत कर्जाकडे होणारी वाटचाल बँकांकडून लपवली जाते. बुडीत कर्ज दाखवावे लागू नये, यासाठी काही बँका पुन्हा कर्जदारांना त्यांच्या कुटुंबियांच्या नावे कर्ज दाखवून त्यामधून हप्ते वसूल करतात. असे विविध प्रकारांद्वारे बँकांतील घोटाळे देशात होत आहेत.विजय मल्ल्या, नीरव मोदी, मेहुल चोक्सी आणि अन्य उद्योजक देशाबाहेर पलायन करतात, तेव्हा त्याला येथील यंत्रणाही कारणीभूत ठरते. भ्रष्टाचार करर्णायांना त्वरित आणि कठोर शिक्षा होईल, तेव्हाच अशा प्रकरणांना आळा बसेल. महाराष्ट्रातही मागील काही वर्षांत स्थानिक बँकांतील घोटाळ्यांचे अनेक प्रकार पुढे आले. नागपूर जिल्हा सहकारी बँक घोटाळा असो किंवा रूपी सहकारी बँक घोटाळा असो, असे अनेक घोटाळे राज्यात घडले. या घोटाळ्यांतील पैशांची वसुली करून गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणुकीचे पैसे परत मिळणे, हे जवळजवळ दुरापास्त असते. ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये तर काही गुंतवणूकदारांची जीवनातील सर्व आर्थिक पुंजी या घोटाळ्यांतून हातची निघून जाते. त्यांना शोक करण्याविना कोणता पर्याय रहात नाही. राष्ट्रीय बँक किंवा ग्रामीण भागांतील सहकारी क्षेत्रातील काही कोट्यवधी रुपयांचे घोटाळे असोत, ते बँकिंग क्षेत्राचे वाभाडे काढणारे आहेत. घोटाळा झाल्यानंतर त्याचे खटले वषार्नुवर्षे न्यायालयांमध्ये चालणे, आरोपी पसार होणे, कोट्यवधी रुपयांचा घोटाळा होऊनही काही वर्षांत आरोपींची जामिनावर सुटका होणे, गुंतवणूकदारांना गुंतवणुकीचे पैसे प्राप्त न होणे हे सर्व प्रकार रोखण्यासाठी व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. सहस्त्रो लोकांचे जीवन उद्धवस्त करर्णाया बँकिंग घोटाळ्यांना रोखण्यासाठी बँकांनी आर्थिक शिस्त पाळायलाच हवी. त्यासाठी रिझर्व्ह बँकेचे बँकांवर चांगल्या प्रकारे नियंत्रण असायला हवे. असे खटले जलद गती न्यायालयात चालवून आरोपींना कठोर शिक्षा व्हायला हवी. असे न झाल्यामुळे बँकांसह देशाची आर्थिक स्थिती ढासळण्याकडे वाटचाल होते, तसेच आर्थिक घोटाळ्यांना ते वाव देणारे ठरते, यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक यांना कठोर व्हावेच लागेल. केवळ कठोर कायदा करून हा प्रश्न त्वरित सुटेल, असेही नाही. गोरगरिबांच्या पैशांवर डल्ला मारून विलासी जीवन जगणे, ही भारतीय संस्कृती नाही. प्रसंगी स्वतः कष्ट घेऊन अन्यांचे भले करणारी भारताची समृद्ध आणि विश्वकल्याणाची परंपरा आहे. पाश्चात्त्य विलासी जीवन नव्हे, तर त्यागावर आधारित हिंदु संस्कृतीचे शिक्षण शाळांमधून दिल्यास अशा प्रकारांना निश्चितच काही प्रमाणात आळा बसेल. कर्ज घेऊन ते बुडवत विलासी जीवन जगणारी नव्हे, तर कष्ट करून आत्मसन्मानाने जगणारी भारतीय परंपरा युवा पिढी जेव्हा आत्मसात करील, तेव्हाच असे प्रकार रोखले जातील.

## सुमारे ४ लाखांचा खर्च... तरीही ग्रामस्थांना उघड्यावर अंत्यविधीची वेळ!
## चिपळूण - कळंबट येथील रखडलेल्या स्मशानशेडच्या कामामुळे ग्रामस्थ संतप्त



**■दिनेश खेडेकर (अडूर - गुहागर)** : मरणोत्तर मान सन्मान मिळवणं ही प्रत्येक व्यक्तीची नैसर्गिक अपेक्षा असते. पण जेव्हा त्या सन्मानात चिखल मिसळतो, तेव्हा ती केवळ विकासाची नाही, तर माणुसकीचीही हार ठरते.

रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत जनसुविधा योजनेतून चिपळूण तालुक्यातील कळंबट ग्रामदेवता देवरहाटी परिसरात रु. ३,९९,९६८ खर्च करून स्मशानशेड उभारण्याचे काम जानेवारी २०२५ मध्ये सुरू झाले. प्रारंभी ग्रामस्थांच्या आशा उंचावल्या; मात्र आज सात महिने उलटूनही हे काम अर्धवट अवस्थेत आहे. विशेष म्हणजे, कंत्राटदाराला कामाच्या एक तृतीयांशहून अधिक रक्कम आगाऊ अदा करण्यात आली आहे. दरम्यान पावसाळा सुरू झाला आणि अपूर्ण स्मशानशेडचे वास्तव समोर आले. शेजारील मोकळ्या जागेत चिखल, गटारे आणि पावसात अंत्यविधी करावे लागत आहे. ही स्थिती गावकऱ्यांना मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या व्यथित करणारी आहे. उभ्या स्मशानशेडच्या शेजारीच ही दुर्दशा घडते आहे. स्मशानशेड ही केवळ भौतिक सुविधा नसून मरणोत्तर सन्मानाची बाब असते. मात्र प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ही गरजही अपूर्ण राहिली आहे. अशा संवेदनशील कामात प्रशासनाची उदासीनता आणि जबाबदारीची टाळाटाळ ग्रामीण भागातील 'विकास' नावाच्या संकल्पनेचा कटू वास्तव प्रतिबिंबित होतो.

स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरी उलटली तरी मूलभूत सुविधांची वानवा. पंचाहत्तर वर्षे उलटून गेली, विकासाच्या कित्येक गप्पा ऐकल्या गेल्या, पण खऱ्या अर्थाने मूलभूत सुविधांची पूर्तता अजूनही धूसरच आहे. याचेच एक विदारक उदाहरण म्हणजे गावातील नवीन स्मशानभूमीचे रखडलेले काम. मग नवीन स्मशानभूमी कशासाठी उभी केली? केवळ कागदावर प्रगती दाखवण्यासाठी का? असा संतप्त सवाल ग्रामस्थ करीत आहेत. त्यामुळे या रखडलेल्या कामाची तात्काळ चौकशी करून संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी ठरवावी, कामाचा दर्जा तपासून ते त्वरित पूर्ण करून स्मशानशेड ग्रामस्थांच्या वापरासाठी खुले करावे, आणि या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## सावर्डे विद्यालयात 'एक मूल एक झाड' उपक्रम



**■सावर्डे** : सह्याद्री शिक्षण संस्था संचलित गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सावर्डे येथे पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने 'एक मूल एक झाड' हा उपक्रम उत्साहात राबवण्यात आला. वाढती लोकसंख्या व त्यामुळे निर्माण होणारे पर्यावरण असंतुलन ही गंभीर समस्या होत चालली आहे. त्यामुळे मर्यादित कुटुंब आणि जास्तीत जास्त झाडांची लागवड करणे ही काळाची गरज बनली आहे. या उपक्रमाअंतर्गत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी फळवृक्षाचे किमान एक झाड लावावे व त्याचे संगोपन करावे अशी संकल्पना मांडण्यात आली. विद्यार्थ्यांनी एकूण सुमारे १४०० झाडांची लागवड केली आणि त्या झाडांचे संगोपन करण्याची प्रतिज्ञाही घेतली. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील हरित सेना व महाराष्ट्र छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी विशेष पुढाकार घेतला. उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करणे, वृक्षारोपणाची जाणीव होणे तसेच झाडांप्रती प्रेम आणि जिव्हाळा निर्माण करणे हा होता. हा उपक्रम प्राचार्य राजेंद्रकुमार वारे व उपप्राचार्य विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी साजिद चिकटे, प्रशांत सकपाळ, संदीप पवार तसेच सर्व शिक्षकवृंदांचे मोलाचे सहकार्य लाभले. ह्लएक मूल एक झाडह्व या उपक्रमातून पर्यावरणप्रेमाची जाणीव प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये रुजावी व त्यांनी हिरवळ टिकवण्यासाठी पुढाकार घ्यावा हा शाळेचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद ठरला आहे. विद्यार्थ्यांना झाडांचे वाटप करताना शालेय समितीचे सदस्य सुभाष शेठ मोहिरे, सुधीर महाडिक पालक शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## विरार नगरीत मनोरंजनाचा धुवांधार; गुहागर मधील पहाडी आवाजाचे शाहीर प्रथमच आमने सामने





**■मुंबई [उदय दणदणे ]** : कोकणातील गरीब गरजू रुग्णांसाठी अल्पदरात रूग्णवाहिका उपलब्ध होण्यासाठी स्व.तानाजी डाफळे प्रतिष्ठान आणि विरार-नालासोपारा-वसई रहिवाशी संघ (गुहागर विधानसभा) संस्थापक/अध्यक्ष मनोज डाफळे यांच्या संकल्पनेतून निधी संकलनासाठी रविवार दिनांक ०३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वा.प.भाऊसाहेब वर्तक हॉल,सांस्कृतिक भवन,विरार-पश्चिम येथे कोकणातील बहुप्रिय लोककला कलगी तुरा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून

कलगी तुरा पटलावर गुहागर तालुक्यातील प्रतीक्षेत असणारे पहाडी आवाजाचे शाहीर कलगीवाले शाहीर विनोद फटकरे (मढाळ-गुहागर)आणि तुरेवाले शाहीर सुशीलकुमार धुमक (निवोशी-गुहागर) ह्या शाहिरांत ही लक्षवेधी जुगलबंदी रंगणार आहे. कलगी तुऱ्याच्या पटलावर हे दोन्ही शाहीर प्रथमच आमने सामने येत असल्याने श्रावण मेघगर्जनेसह विरार नगरीत मनोरंजनाचा धुवांधार रसिकांना पाहायला मिळणार आहे. प्रत्येक शब्दा शब्दांवर होणारी ही जुगलबंदी नाविन्यतेची आगळीक पर्वणी असणार आहे.

सदर उपक्रमाला गुहागर सुपुत्र तसेच शिवसेना वरळी माजी नगरसेवक दत्ता नरवणकर, समाजसेवक संतोष जैतापकर, समाजसेवक जयराम पवार, संतोष दादा जैतापकर वैद्यकीय मदत कक्ष,गुहागर प्रतिष्ठान विरार,यांचे विशेष सहकार्य लाभले असून वैद्यकीय क्षेत्रातील ह्या महत्वपूर्ण उपक्रमाच्या संकलननिधी प्रति आयोजित कलगी तुरा कार्यक्रमाला कलाप्रेमी रसिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहून मनोरंजनाचा आस्वाद घ्यावा, अधिक माहितीसाठी ९८८११५८४३/ ९१४५१३२३०० या भ्रमणध्वनी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जावई हा दहावा ग्रह असतो...

बादशहा अकबराचे एकदा त्याच्या जावयाशी जोरदार भांडण झाले. संतापलेल्या सासरा अकबराने राज्यातील सगळ्या जावयांना सुळावर चढवण्याचा हुकूम दिला. अकबराच्या या लहरी हुकूमामुळे राज्यातील सगळेच जावई घाबरून गेले. त्यात कोणाचे ना कोणाचे नुकतेच जावई झालेलेही होतेच तर जुनेजाणते जावईही होते. बादशहाचे त्याच्या जावयाशी झालेल्या भांडणाची शिक्षा सगळ्याच जावयांना त्यांचा कोणताही गुन्हा नसताना भोगावी लागणार या भीतीने सगळेच जावई गारठून गेले, या अडचणीतून सोडवण्यासाठी आणि बादशहा अकबराला सुबुद्धी मिळावी म्हणून राज्यातल्या जावयांचे एक शिष्टमंडळ बिरबलाकडे गेले.बादशहाच्या या लहरी हुकूमातून आम्हाला वाचवा अशी विनवणी त्यांनी बिरबलला केली. बिरबलाने थोडा विचार करून त्यांना तुम्ही चिंता करू नका, मी पाहतो काय ते असं बोलून त्यांना परत पाठवले आणि लगोलग राज्याच्या मुख्य धातू कारागिराला वेगवेगळ्या धातूचे कित्येक सूळ बनवण्यास सांगितले, यात काही सूळ लोखंडाचे होते, काही तांब्याचे तर काही मौल्यवान सोन्याचांदीचे हिरेजडीत सूळ बनवण्यास बिरबलाकडून सांगण्यात आले. बादशहाच्या कानावर ही बातमी गेली तेव्हा त्याने बिरबलास बोलवणे धाडले आणि म्हणाला, बिरबला वेगवेगळे सूळ बनवण्याचे उद्योग का करत आहेस? त्यावर बिरबल म्हणाला, महाराज आपल्या हुकूमाच्या अंमलबजावणीसाठी हे सगळे केले जात आहे.

राज्यातले सगळेच पुरुष कोणाचे ना कोणाची जावई आहेतच, यात सामान्य लोकांसोबतच वतनदार, अधिकारी, जमीनदारही आहेत. त्यांच्या समाजातील दजार्नुसार त्यांना सुळावर चढवण्यासाठी हे वेगवेगळे सूळ बनवण्यास घेतले आहेत. हा हिरेजडीत सूळ तर प्रत्यक्ष आपल्यासाठीच आहे, यावर राजा अकबर चपापला आणि म्हणाला, माझ्यासाठी का? यावर बिरबल म्हणाला, राज्यातल्या सगळ्याच जावयांना सुळावर चढवण्याचा आपण दिलेला हुकूम आपल्यालाही लागू होतोच की, आपणही बेगमसाहेबांच्या वडिलांचे जावईच आहात ना, यावर राजा अकबराने आपला मूर्खपणाचा हुकूम मागे घेतला. जामातो दशमो ग्रहा या संस्कृत वचनानुसार जावई हा दहावा ग्रह असल्याने त्याची दहशत राजकारणातही कायम आहे. भले भले राजकारणी त्यांच्या जावयां मुळे अडचणीत आले आहेत. त्यामुळेच या जावयाचा मानपान, त्याचे रुसणे फुगणे सासरकडच्यांना सहन करावे लागते.राजकारण किंवा समाजकारणात जास्तीची सवलत मिळाल्यास स्वतःला सरकारचे जावई समजता का? अशी हेटाळणी महाराष्ट्राच्या राजकारणात नवी नाही. सम्राट अकबरासारख्याच जावयांनी त्रासलेल्या राजकारण्यांनी आता अखिल भारतीय जावई पीडित संघटनाकाढण्यास हरकत नाही, रत्नाकर मतकरींच्या जावई माझा भला नाटकातला भला जावई आणि प्रेमळ सासरा राजकारणाच्या पटावर चालत नाही. इथं ह्यखट्याळ जावई आणि ह्यनाठाळ सासराच असावा लागतो.

## पान १ वरुन...

### पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची गणेशभक्तांकडून...

मागणी असल्याची माहिती ठाण्यातील एका गणेशमुतीर्कारांनी दिली. यंदा पर्यावरणपूरक गणेश मुर्तीमध्ये शाडूमातींसह आणखी काही पर्याय उपलब्ध झाले आहेत. या मुर्ती पीओपी आणि शाडू मातीप्रमाणे सुबक आणि आकर्षक असल्यामुळे नागरिकांच्या पसंतीस पडत आहेत. ठाणे, डोंबिवली, कल्याण सह इतर शहरात देखील या मूर्तींना मोठ्याप्रमाणात मागणी असल्याची माहिती गणेशमुतीर्कारांनी दिली.

### कोकणात गणपती सणाला येणाऱ्या...

मलमपट्टी केली जाते. मात्र पुन्हा खड्डे पडल्यामुळे नागरिकांमधून प्रशासन व बांधकाम विभाग यांच्या विरोधात संताप व्यक्त होत आहे.

### सरकारी कर्मचाऱ्यांना सोशल मीडिया...

राहतील. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. राज्य शासनातील अधिकारी-कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम तसेच प्रतिनियुक्तीने किंवा करारपद्धतीने नेमलेले कर्मचारी यांना हे नियम लागू राहणार आहेत.

शासनाच्या किंवा भारतातील कोणत्याही शासनाच्या चालू किंवा अलिकडच्या धोरणावर प्रतिकूल टीका करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच सोशल मीडियाचा वापर जाणीवपूर्वक आणि जबाबदारीने करावा.

वैयक्तिक आणि कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट स्वतंत्र ठेवावेत. केंद्र किंवा राज्य शासनाने बंदी घातलेल्या वेबसाईट किंवा ॲपचा वापर करू नये. शासकीय योजना व उपक्रमांच्या प्रसारासाठी केवळ अधिकृत आणि प्राधिकृत माध्यमांचा वापर करावा. कार्यालयीन कामकाजाच्या समन्वयासाठी व्हॉट्सॲप, टेलिग्रामसारख्या मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वापर करता येईल.

शासकीय योजनांच्या यशस्वितेसंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट करता येईल; मात्र त्यातून स्वयंप्रशंसा होणार नाही याची दक्षता घ्यावी. वैयक्तिक अकाऊंटवर शासकीय पदनाम, लोगो, गणवेश, शासकीय मालमत्तेचे फोटो किंवा व्हिडिओ अपलोड करू नयेत. आक्षेपार्ह, द्वेषमूलक, भेदभाव करणारा मजकूर पोस्ट किंवा फॉरवर्ड करणे मनाई आहे. प्राधिकृत मंजुरीशिवाय कोणतेही गोपनीय दस्तऐवज सोशल मीडियावर अपलोड करू नयेत. बदली झाल्यानंतर कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट योग्य प्रकारे हस्तांतरित करावे.

शासनाने स्पष्ट केले आहे की, या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगात्मक कारवाई केली जाईल. डिजिटल युगात सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर व्हावा आणि शासकीय यंत्रणेचा विश्वासार्हता अबाधित राहावी, यासाठी नियमावली करण्यात आली आहेत.

### हातखंबायेथील वळणावर एलपीजी...

घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत रत्न ागिरी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी क्षणाचाही विलंब न करता स्वतः घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्यासोबत होम डीवायएसपी फडके मॅडम, एलसीबीचे निरीक्षक नितीन ढेरे, शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विवेक पाटील आणि आरटीओ पोलीस अधिकारीही तात्काळ पोहोचले. मध्यरात्रीपासूनच अपघातस्थळी आणि हातखंबा तिठ्यावर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला. जिल्हाधिकारी एम. देवेंद्र सिंह, प्रांताधिकारी जीवन देसाई आणि अप्पर निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी यांनीही परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी घटनास्थळी हजेरी लावली.

गॅस गळतीमुळे निर्माण झालेल्या संकटाला तोंड देण्यासाठी एमआयडीसीचे विशेष पथक, तीन अग्निशामक बंब, रुग्णवाहिका, पोलीस आणि महसूल यंत्रणा एकत्रितपणे कामाला लागली. संभाव्य धोका टाळण्यासाठी अपघातस्थळाजवळील नागरिकांचे तात्काळ स्थलांतर करण्यात आले. पोलीस अधीक्षक बगाटे यांच्या नेतृत्वाखाली गॅस गळती रोखण्याचे प्रयत्न यशस्वी झाले आणि काही तासांच्या अथक परिश्रमानंतर परिस्थिती नियंत्रणात आणली गेली. मध्यरात्री २ वाजल्यापासून सकाळी ११ वाजेपर्यंत गॅसचा साठा दुसऱ्या रिकाम्या टँकरमध्ये सुरक्षितपणे ट्रान्सफर करण्यात आला. दरम्यान, हातखंबा-पाली मार्गावरील वाहतूक पूर्णतः बंद ठेवण्यात आली आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक बावनदीमार्गे पालीकडे, तर लांजा मार्गावरील वाहने कुवारबाव-काजरघाटी मार्गे किंवा पावस मार्गे लांजा अशी वळवण्यात येत आहेत.

अलीकडेच निवळी घाटात झालेल्या गॅस टँकर अपघाताची आठवण ताजी असतानाच, हातखंबा येथील ही दुसरी घटना प्रशासनासाठी एक आव्हान होती. मात्र, पोलीस अधीक्षक आयपीएस नितीन बगाटे यांच्या नेतृत्वगुणांमुळे आणि विविध यंत्रणांच्या अचूक समन्वयामुळे हा मोठा अनर्थ टळला. गॅस गळतीसारख्या अत्यंत धोकादायक परिस्थितीत वेळेवर घेतलेले निर्णय, रात्रभर चाललेली बचाव कारवाई आणि विविध घटकांमधील एकजूट यामुळे रत्नागिरी पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचा आदर्श नमुना समोर आला आहे.

### रक्षाबंधनाच्या निमित्त 'एक राखी,...

उपक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक विभाकर वाचासिद्ध यांच्या हस्ते युनायटेड इंग्लिश स्कूलच्या प्रवेशद्वारावर सरस्वती व मातृ पूजनाने झाली. इयत्ता आठवी व नववीतील सुमारे ६०० विद्यार्थी तिरंगा हातात घेऊन 'वंदे मातरम्', 'भारत माता की जय' अशा गगनभेदी घोषणा देत रॅलीत सहभागी झाले. रॅलीच्या मार्गावर देशभक्तिपर गाणी आणि घोषणांनी वातावरण भारावून गेले.

या उपक्रमाचा विशेष भाग ठरला तो म्हणजे १८ विद्यार्थ्यांचे वडील सध्या भारतीय सैन्यात कार्यरत असून त्यांच्या मुलांनी स्वतः बनवलेल्या राख्या थेट त्यांच्या युनिटच्या पत्त्यावर पाठवल्या. या राख्या केवळ प्रेमाचे नव्हे तर मनोबल वाढवणाऱ्या शुभेच्छांचे प्रतीक ठरल्या.

पोस्ट ऑफिस परिसरात पोहोचल्यावर युनायटेड व गद्रे स्कूलच्या महिला शिक्षकांनी अधिकाऱ्यांचे औक्षण केले व त्यांना राख्या बांधल्या. या प्रसंगी प्रांताधिकारी आकाश लिगाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रकुमार राजमाने, नगर परिषदेचे मुख्याधिकारी विशाल भोसले, प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढांबकर, नायब तहसीलदार श्री. मोरे, उद्यानप्रमुख बापू साडविलकर यांची विशेष उपस्थिती लाभली. या अधिकाऱ्यांच्या हस्ते जवानांसाठीच्या राख्यांची पाकिटे पोस्टमास्तर श्रीमती जोशी व अधिकारी श्री. कदम यांच्याकडे औपचारिकपणे सुपूर्द करण्यात आली.

मुख्याध्यापक विभाकर वाचासिद्ध यांनी सांगितले की, 'राखी केवळ बंधाचा सण नसून ती रक्षण, सन्मान आणि देशप्रेमाचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभावना निर्माण व्हावी, यासाठीच 'एक राखी, एक देश' उपक्रम राबवण्यात आला.'

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात उपमुख्याध्यापक संजय बनसोडे, सौ. नाईक (प्रेमजीभाई आसर स्कूल), सौ. रानडे (शिशुविहार), श्रीमती यशोदे (गद्रे इंग्लिश मीडियम), सौ. गोरीवले, सौ. पोटसुरे, संदीप मुंडेकर, वैशाली चितळे, पराग लघाटे, श्री. खेडेकर, तुषार जाधव, मानसी पेढांबकर, समीर कालेकर, श्री. धापसी यांचे सहकार्य लाभले. अनेक पालक प्रतिनिधीही उपस्थित होते.

प्रांताधिकारी आकाश लिगाडे यांनी विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध रॅलीचे कौतुक करत उपक्रमाचे गौरवोद्गार काढले. 'शिक्षणासोबत राष्ट्रप्रेम व मूल्यशिक्षण देणारा हा उपक्रम खरोखर प्रेरणादायी आहे,' असे ते म्हणाले. या देशप्रेमाच्या अनोख्या उत्सवाची सांगता 'महाराष्ट्र गीत'च्या सामूहिक गायनाने झाली. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमामुळे रक्षणसूत ही केवळ पारंपरिक राखी न राहता, ती देशभक्तीचे प्रतीक बनली.

### रत्नागिरीतील मच्छी विकणाऱ्या महिलेची...

केली पाहिजे. आपल योग्य क्षेत्र निवडून तयारी करावी असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला आहे.

# ३९० कोटींचे एमडी जप्त; साकीनाका पोलिसांकडून कर्नाटकमध्ये कारवाई



■**मुंबई** : साकीनाका पोलिसांनी कर्नाटकमधील म्हैसूर येथे अमली पदार्थ निर्मितीच्या कारखान्यावर छापा टाकून ३८१ कोटी रुपये किंमतीचे १८७ किलो एमडी (मॅफेड्रिन) जप्त केले. वसईतील गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी ३ महिन्यात ३९० कोटी रुपये किंमतीचे एमडी जप्त केले आहे. या प्रकरणात चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

साकीनाका पोलिसांनी एप्रिल महिन्यात वसई (पूर्व) परिसरातील कामण येथे अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या तिघांना अटक केली होती. त्यांच्याकडून चार किलो ५३ ग्रॅम वजनाचे आठ कोटी रुपये किंमतीचे एमडी जप्त करण्यात आले होते. या प्रकरणात सलीम शेख उर्फ सलीम लंगडा (४५) हा मुख्य आरोपी फरारी होता. या प्रकरणाचा तपास साकीनाका पोलीस तपास करत होते. पोलिसांच्या विशेष पथकाने वांद्रे रेक्लेमेशन येथून सलीम लंगडा याला अटक केली.

कर्नाटकमधील म्हैसूर येथून एमडी आणत असल्याची माहिती सलीम लंगडाने चौकशीत दिली. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण करून तपास सुरू केला. म्हैसूर शहरातील रिंग रोडवरील रस्त्याच्या कडेला निळ्या पत्र्याच्या शेडमध्ये एमडीचा कारखाना सुरू असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकून १८७ किलो एमडी जप्त केले. त्याची आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार ३८१ कोटी रुपये किंमत आहे. याशिवाय एमडी बनविण्यासाठी लागणारे अल्कोहोल, क्लोरोफॉर्म, मॅग्निशिअम सल्फेट, ॲसीटोन आदी रसयाने आणि अन्य साहित्य जप्त केले. या प्रकरणी एकूण चौघांना अटक करण्यात आली आहे.

वसईमधील कामण येथे एप्रिलमध्ये आठ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. या प्रकरणाचा तपास करताना म्हैसूर येथून ३८१ कोटी रुपयांचे एमडी जप्त करण्यात आले. एकाच गुन्ह्यात तीन महिन्यात तब्बल ३९० कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आल्याची माहिती परिमंडळ-१० चे पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे यांनी दिली.

परिमंडळ १० चे पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (मेघवाडी विभाग) संपत पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त (साकीनाका विभाग) प्रदीप मैराळे, साकीनाका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद तावडे, पोलीस निरीक्षक युवराज क्षीरसागर, सहाय्यक पोलीस निरीक्षक दयानंद वणवे, पोलीस उपनिरीक्षक पंकज परदेशी, पोलीस हवालदार शशिकांत पाटील, चंद्रकांत पवार, नितीन खैरमोडे, अनिल कारंडे आदींच्या पथकाने या प्रकरणाचा तपास केला.

# गोरेगाव-मोतीलाल नगरमधील पुनर्विकास प्रकल्पाला सुप्रीम कोर्टाचा हिरवा कंदील

■**मुंबई** : मुंबईतील गोरेगाव येथील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पाला अखेर सर्वोच्च न्यायालयाचा हिरवा कंदील मिळाला आहे. म्हाडाला या प्रकरणात मोठा विजय मिळाला असून, प्रकल्पविरोधी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. हा निर्णय मुंबईच्या आणि म्हाडाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने जनकल्याणकारी समिती आणि मोतीलाल नगर रहिवासी संघाच्या विशेष याचिका फेटाळून लावल्या. या निर्णयामुळे माधवी राणे, गौरव राणे व अन्य प्रकल्प विरोधकांना मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, रहिवाशांची संमती प्रकल्पासाठी गरजेची नाही, असा निवाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. याशिवाय, पुनर्विकासानंतर रहिवाशांना मिळणाऱ्या १६०० चौ. फूट बांधकाम क्षेत्रावरही न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे.



मुंबई उच्च न्यायालयापाठोपाठ आता सर्वोच्च न्यायालयातही म्हाडाने विजय मिळवला आहे. गेल्या शुक्रवारी निलेश प्रभूंच्या मोतीलाल नगर विकास समितीची याचिकाही मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली होती. त्यामुळे, म्हाडासाठी हा एक दुहेरी विजय ठरला आहे, ज्याने मोतीलाल नगरवासियांचे रखडलेले स्वप्न साकार होण्याचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे.

मुंबईच्या आणि म्हाडाच्या इतिहासातील हा एक अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि भव्य प्रकल्प आहे. ७ जुलै रोजी म्हाडाने अदानी समूहाची खासगी विकासक म्हणून करार करून नियुक्ती केली होती. या प्रकल्पामुळे हजारो स्थानिक रहिवाशांना प्रशस्त, अत्याधुनिक आणि सुरक्षित घरे मिळतील. रहिवाशांना १६०० चौ. फूट (Sq Ft) बांधकाम क्षेत्राची घरे मिळतील, तर व्यावसायिकांना ९८७ चौ. फुटांचे गाळे मिळतील. यामुळे या परिसराचा कायापालट होणार असून, मुंबईच्या विकासातही हा प्रकल्प महत्त्वाचा ठरेल.

# 'लाडकी बहीण योजने' त घोटाळा, 'एसआयटी' चौकशी करा- खासदार सुप्रिया सुळे

■**मुंबई** : राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी 'लाडकी बहीण योजने'वरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी काही सवाल उपस्थित करत महायुती सरकारवर गंभीर आरोप केलेत. 'लाडकी बहीण योजने'त ४ हजार ८०० कोटींचा घोटाळा झालाय. महिलांचे पैसे पुरुषांच्या खात्यात कसे गेले? या घोटाळ्याची एसआयटी चौकशी करा,' अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत बोलताना केली.



'योजनेच्या पहिल्या टप्प्यात २६ लाख फॉर्म कसे रद्द झाले नाहीत? सॉफ्टवेअरमध्ये घोटाळा आहे. त्यात घोटाळा झाला असल्यास त्यासाठी राज्य सरकार जबाबदार असेल. त्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांना घ्यावी लागेल. तसंच संपूर्ण मंत्रिमंडळाची देखील जबाबदारी आहे,' असं म्हणत खासदार सुप्रिया सुळे यांनी महायुती सरकारवर गंभीर आरोप केलेत.

'राज्य सरकारनं या प्रकरणात कारवाई केली नाही तर संसदेत हा प्रश्न उपस्थित करणार आहे. मी कुणावरही भ्रष्टाचाराचे खोटे आरोप केले नाहीत आणि करणारही नाही. मी अदिती तटकरेंवर आरोप केले नाहीत. तसंच एकट्या अदिती यांच्यावर आरोप करणार नाही. याला संपूर्ण मंत्रिमंडळ जबाबदार आहे,' असं म्हणत सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत.

# जळगावात रसायनांपासून दूध; पोलिसांच्या कारवाईत ८० लिटरचा साठा नष्ट

■**नाशिक** : जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील भवरखेडे येथे घातक रसायनांपासून दूध तयार करून ते ग्राहकांना विकणाऱ्या एका तरूणाला अटक करण्यात आली. ही कारवाई अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांच्या पथकाने सोमवारी मध्यरात्री केली. या प्रकरणी संशयिताच्या विरोधात गुन्हा दाखल झाला असून, सुमारे ८० लिटर भेसळयुक्त दूध नष्ट करण्यात आले आहे.

आरोग्याच्या दृष्टिकोनातून दूध हे शरीरासाठी पोषक मानले जाते. आणि त्याचा वापर लहान बालकांपासून ते वृद्ध व्यक्तींपर्यंत सर्वजण पिण्यासाठी करतात. मात्र, जळगाव जिल्ह्यात काही ठिकाणी दुधात भेसळीचे प्रकार होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन विभागाने काही दिवसांपूर्वी दूध भेसळ तपासणी मोहीम देखील राबविली होती. त्या माध्यमातून विविध ठिकाणच्या खासगी डेअरींमधीन दुधाचे नमुने विश्लेषणासाठी ताब्यात घेतले होते. या तपासणी नमुन्यात दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई सुद्धा करण्यात आली होती. त्यानंतरही दूध भेसळीचे प्रकार थांबलेले दिसत नाही.



धरणगाव तालुक्यात भवरखेडा येथे सोमनाथ आनंदा माळी (३१) हा तरूण आरोग्यास अपायकारक असलेल्या रसायनांचा वापर करून भेसळयुक्त दुध तयार करून ग्राहकांना राजरोसपणे विकत होता. त्याबाबतची माहिती जळगाव येथील अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी किशोर साळुंखे यांना मिळाली होती. त्याची खात्री करून त्यांनी धरणगाव पोलीस ठाण्याला त्याविषयी माहिती दिली. पोलीस कर्मचारी मदतीला घेऊन सोमवारी मध्यरात्री भवरखेडा येथे नियोजनबद्ध छापा टाकण्यात आला. तेव्हा सोमनाथ माळी हा रसायनांचा वापर करून दूध तयार करत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली सुद्धा दिली. अन्न सुरक्षा अधिकारी साळुंखे यांनी दिलेल्या तक्रारीवरून संशयित सोमनाथ याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर त्याच्याजवळील सर्व रसायने जप्त करण्यात आली.

पोलीस उपनिरिक्षक संतोष पवार, हवालदार वर्षा गायकवाड तसेच धरणगाव पोलीस ठाण्यात हजर असलेले जळगाव येथे स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत उपनिरिक्षक जितेंद्र वलटे, हवालदार रवींद्र पाटील, दीपक माळी, विष्णू बिऱ्हाडे, बाबासाहेब पाटील यांनी कारवाईत भाग घेतला. दूधातील भेसळ ही गंभीर बाब आहे. नागरिकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम टाळण्यासाठी दुधात भेसळ करणाऱ्या व्यक्तींविरोधात यापुढे कठोर कारवाई करण्यात येईल. त्यानुषंगाने जिल्ह्यात दूधाचे सर्वेक्षण नमुने घेण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी दुधात भेसळ होत असल्याचे दिसून आल्यास तातडीने माहिती द्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# महावितरण कंपनीने स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांची संमती घ्यावी : केदार काळे

■**पालघर** : सध्या पालघर जिल्ह्यात व महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित म्हणजेच महावितरण कंपनीने नवीन स्मार्ट मीटर बसविणे सुरू केले आहे, याबाबत ग्राहकांच्या खूप तक्रारी आहेत, म्हणून शिवसेनेचे प्रवक्ते श्री केदार काळे यांनी कार्यकारी अभियंता महावितरण पालघर विभाग यांना पत्र लिहून स्मार्ट मीटर बसविण्याआधी ग्राहकांची परवानगी घ्यावी अशी मागणी केली आहे, श्री काळे पुढे म्हणतात महावितरणचे अधिकारी ग्राहकांची परवानगी न घेता स्मार्ट मीटर बसवीत आहेत, बहुसंख्या ग्राहकांचा ह्याला विरोध आहे, ग्राहकांचे म्हणणे महावितरण चे अधिकाऱ्यांनी ऐकून घ्यावे असेही काळे यांचे म्हणणे आहे. ग्राहकांच्या म्हणण्यानुसार आधीचे साधे मीटर व आत्ता बसवलेली नवीन स्मार्ट मीटर यामध्ये विद्युत बिलाची तफावत आहे पूर्वीच्या विद्युत बिला पेक्षा स्मार्ट मीटर मध्ये विद्युत बिल जास्त येते. महावितरण चे अधिकारी हे खरे नाही असे म्हणतात, दोन दिवसांपूर्वी महावितरणचे महाराष्ट्राच्या प्रो. श्री केदार काळे यांचे बोलणे झाले, महावितरणची बाजू मांडताना बिल जास्त येत नसल्याचे सांगितले, विद्युत ग्राहकांना रोज एस.एम.एस येतो त्यांनी किती युनिट्स वापरली असेही सांगितले.

# पनवेल एसटी डेपोचा रखडलेला महत्वपूर्ण विकास लवकर मार्गी लावावा- आम. विक्रांत पाटील

■**मुंबई** : पनवेल एसटी डेपो हा महाराष्ट्रातील काही प्रमुख मोठ्या बस आगारांपैकी एक मानला जातो. कोकण, तसेच संपूर्ण महाराष्ट्राचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या पनवेलचे भौगोलिक महत्त्व हे फार मोठे आहे व अनेक वर्षांपासून पनवेल बस डेपो येथून हजारो एसटी बसेसची वाहतूक होत असते. आजही पनवेल बस डेपो मधून दिवसाला अडीच हजार गाड्या ये-जा करतात. अशा स्थितीमध्ये पनवेल बस डेपोची अवस्था ही फार दयनीय झालेली आहे.



इ.ड.ळ. तत्त्वावरती या बस डेपोच्या विकासाचे काम हे एका कंत्राटदाराला दिले आहे. परंतु सुरुवातीपासूनच या कंत्राटदाराने कामामध्ये दिरंगाई केली आहे. आता काही तांत्रिक अडचणीमुळेही हा प्रकल्प धिम्या गतीने सुरू आहे. आमदार विक्रांत पाटील यांनी वेळोवेळी या विषयाचा पाठपुरावा करत, अधिवेशन काळात या विषयाची विशेष चर्चा घडवून आणली होती. या विषयाची एक विस्तृत बैठक सुद्धा परिवहन मंत्री मा. ना. प्रताप सरनाईक यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. परंतु अजूनही या विषयात काही ठोस कार्यवाही होताना दिसत नाही. पनवेल बस डेपोचा रखडलेला प्रश्न मार्गी लागावा याकरिता तात्काळ कार्यवाही करा, तसेच दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारावरही तात्काळ कारवाई करा, अशी मागणी आमदार विक्रांत पाटील यांनी केली आहे.

इ.ड.ळ. तत्वावर जर हा प्रकल्प पूर्ण करणे शक्य होत नसेल व त्यामध्ये प्रकल्पाच्या उंचीचे कारण दाखवत पर्यावरण खात्याकडून काही अडचणी असतील, तर या प्रकल्पाचे स्वरूप तात्काळ बदलावे व इ.ड.ळ. ऐवजी शासनाकडून या प्रकल्पाला पुढे नेण्याकरिता प्रयत्न करावे, जेणेकरून प्रकल्पाच्या उंचीचा प्रश्न हा निकाली निघू शकेल व प्रकल्प पूर्ण होऊ शकेल. सोमवारी पनवेल बस डेपो येथे पाच नवीन बसेसचे लोकार्पण आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. लांबपल्ल्यासाठी पाच नवीन बसेस आज सेवेत दाखल झाल्या व त्याचा शुभारंभ आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी आमदार विक्रांत पाटील बोलत होते.

# बेकायदेशीर स्टॉल्सची पाठराखण करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करा; हायकोर्टाचे पालिका आयुक्तांना आदेश



■**मुंबई** : शहरातील एका गृहनिर्माण सोसायटीच्या बाहेरील फूटपाथवर बेकायदेशीर उभारलेल्या पानटपरी स्टॉलची पाठराखण करणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करा, असे निर्देश उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना दिले आहेत. संबंधित अनधिकृत स्टॉल तत्काळ हटवण्याचे आदेश देतानाच सहा वर्षांहून अधिक काळ त्या स्टॉलविरुद्ध कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी सुरू करण्याचे निर्देश हायकोर्टान दिले आहेत. निर्वाण गृहनिर्माण सोसायटीने दाखल केलेल्या याचिकेवर, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. नोव्हेंबर २०१९ मध्ये पालिकेने बेकायदेशीर स्टॉलचे पाडकाम केले होते. त्यानंतर पुन्हा तो स्टॉल त्याच जागेवर उभा करण्यात आला. कोणताही वैध परवाना वा परवानगीशिवाय स्टॉलचे बांधकाम उभारले गेल्याचा आरोप गृहनिर्माण सोसायटीने याचिकेतून केला होता. त्याची गंभीर दखल घेत खंडपीठाने संबंधित पालिका अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. १७ जुलै २०२३ रोजीच्या तपासणी अहवालात बेकायदेशीर स्टॉल एका फूटपाथवर उभारला गेल्याचे म्हटले होते. त्या स्टॉलधारकाने आरोग्य आणि व्यापार हे दोन्ही परवाने मिळवले नव्हते, असे त्या तपासणी अहवालातून उघड झाले होते. याबाबत खंडपीठाने कठोर भूमिका घेताच पालिकेने स्टॉलवर कारवाई करणार असल्याची सारवासारव केली. २३ जुलै २०२५ रोजी पालिका कायद्यांतर्गत स्टॉलधारकाला तो स्टॉल स्वेच्छेने हटवण्यासाठी ४८ तासांची नोटीस बजावण्यात आली होती. त्याची नोंद घेत खंडपीठाने पालिका प्रशासनाला कार्यवाहीचा अहवाल ४ सप्टेंबर २०२५ पूर्वी सादर करण्याचे आदेश देत याचिकेची सुनावणी २९ जुलैला निश्चित केली. फूटपाथवरील अतिक्रमणावरून न्यायालयाने पालिका प्रशासन आणि अतिक्रमणकर्त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. फूटपाथ ही सार्वजनिक जागा आहे. ही जागा पादचाऱ्यांच्या वापरासाठी आहे. या जागेचा खासगी फायद्यासाठी वापर केला जाऊ शकत नाही, अशा बेकादेशीर स्टॉलला वीज कनेक्शन कसे दिले? पालिका अधिकाऱ्यांनी यापूर्वी स्वतःहून कारवाई का केली नाही? असा प्रश्नांचा भडीमार न्यायालयाने केला. अशा अराजकतेला परवानगी देता येणार नाही, असे स्पष्ट करत खंडपीठाने पालिका आयुक्तांना वॉर्ड अधिकारी, सहाय्यक आयुक्त व संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश दिले.

# 'तात्काळ बॅकसीट ड्रायव्हिंग बंद करा...', सरकारचा एअर इंडियाला थेट इशारा, काय आहे प्रकरण?



■**मुंबई** : AI-171 संदभार्तील दुर्घटना आणि त्यानंतर घडलेल्या घटनांक्रमामुळं देशातील विमान सुरक्षा व्यवस्थेवर अनेक प्रश्न उपस्थित केले जात होते. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने टाटा सन्स आणि एअर इंडियाचे चेअरमन एन चंद्रशेखरन यांना थेट इशारच दिला आहे. सरकारने स्पष्ट केलं आहे की, एअर इंडियाच्या विभागात बॅकसीट ड्रायव्हिंग म्हणजेच पडद्यामागून निर्णय घेण्याची संस्कृती संपवण्यात यावी. नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू, सचिव समीर कुमार सिन्हा आणि ऊफ्छअ प्रमुख फैज अहमद किदवई यांनी शुक्रवारी एन चंद्रशेखरन यांची भेट घेतली. यावेळी सुरक्षासंबंधीत विविध विभाग जसे, ट्रेनिंग, इंजिनियरिंग, मेंटेनेंस आणि ऑपरेशन कंट्रोल सेंटर यासारख्या प्रमुख सुरक्षा-संबंधित विभागांमध्ये स्पष्ट अधिकार आणि जबाबदारीची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. अधिकाऱ्यांच्या मते, अनेक प्रकरणांमध्ये निर्णय दुसरे कोणीतरी घेत असताना ते तिसऱ्याकडून घेतले जात असतात. ही व्यवस्था धोकादायक आहे आणि ती तात्काळ रद्द करण्याची गरज आहे. जेव्हा एखादी चूक होते तेव्हा प्रत्यक्षात निर्णय घेणारे लोक पुढे येत नाहीत, एअर इंडियावर ठपका एका वृत्त संस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, एअर इंडियामध्ये बऱ्याच काळापासून अशी परिस्थिती दिसून येत आहे की जेव्हा जेव्हा चूक होते तेव्हा प्रत्यक्षात निर्णय घेणारे लोक पुढे येत नाहीत. उलट, क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना बळीचा बकरा बनवले जाते. क्रू शेड्युलिंगमध्ये अनियमितता आढळल्याबद्दल डीजीसीएने आधीच तीन अधिकाऱ्यांना काढून टाकले आहे आणि जर निष्काळजीपणा सुरू राहिला तर एअरलाइन बंद होऊ शकते असा इशारा दिला आहे. त्याव्यतिरिक्त सरकारने एअर इंडियाकडून त्यांच्या गुडगाव परिसरात जुन्या क्रॅश झालेल्या विमानांचे भाग जसे की सीट्स, फ्लाइट डेटा रेकॉर्डर इत्यादी प्रदर्शित करण्यावरही प्रश्न उपस्थित केले आहेत.

# कांदा उत्पादक शेतकरी आक्रमक; कांदे फेकून आंदोलन

■**नाशिक** : कांदा उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने मंगळवारी नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात केले. कांद्याच्या मुद्द्यावर चचेर्साठी आलेल्या शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाला अधिकाऱ्यांनी वेळ न दिल्याने शेतकरी संतप्त झाले होते. या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनासमोर कांदा फेकून आपला रोष व्यक्त केला. तसेच थेट जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर कांदे फोडून आपला निषेध व्यक्त केला.

नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात कांदा उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे काही पदाधिकारी मंगळवारी कांद्याच्या मुद्यांवर चर्चा करण्यासाठी आले होते. मात्र या ठिकाणी या शिष्टमंडळाला भेटण्यासाठी अधिकारी वेळ देत नसल्याने शेतकरी संतप्त झाले होते. दरम्यान या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्या दालनाच्या बाहेरच कांदे फोडून रोष व्यक्त करत घोषणाबाजी देखील केली. हातात कांदे घेऊन शेतकऱ्यांनी सरकारच्या कांदा विरोधी धोरणांचा निषेध केला. आक्रमक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनाबाहेरच घोषणाबाजी करायला सुरुवात केल्याने पोलिसांनी आंदोलकांची धरपकड सुरू केली. यामुळे



आंदोलक आणखी आक्रमक झाले. तर आंदोलकांनी थेट निवासी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनाबाहेरच पुन्हा एकदा कांदे फोडले. तसेच आपल्या सोबत आणलेली शिदोरी सोडून निवासी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर ठिय्या मांडून कांदा भाकर आंदोलन सुरू केले.

केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी न करण्याचे धोरण स्वीकारावे आणि ते पुढील २० वर्षांसाठी कायम ठेवावे. कांद्याची किमान आधारभूत किंमत (MSP) उत्पादन खर्च व नफा यावर आधारित किमान ३,००० रुपये प्रति क्विंटल ठेवावी. राज्य शासनाने कांदा हमी दराने खरेदी करण्यास सुरुवात करावी आणि यासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करावे.कमी दरात कांदा विकलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल किमान १,००० रुपये अनुदान द्यावे. राज्यात कांदा प्रक्रिया उद्योगांची स्थापना करावी.

वाहतूक आणि इंधन दरात सवलत देऊन कांद्याचा पुरवठा सुलभ करावा व निर्यातीवर १०% अनुदान मिळावे. बफर स्टॉकसाठी कांदा बाजार समित्यांमधूनच किमान ३,००० रुपये दराने खरेदी करावा अन्यथा नाफेड व एनसीसीएफ यांची खरेदी बंद करावी अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

# श्रावणात घ्या पुण्यातील प्राचीन शिव मंदिरांचे दर्शन



**श्रा**वण महिना हा भगवान शकंराला समर्पित असतो. या महिन्यात देशभरातील शिव मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. या सर्व मंदिरांमध्ये अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच भाविकांसाठी विशेष व्यवस्था देखील केली जाते. आज आपण पुण्यातील प्राचीन शिव मंदिरांची माहिती जाणून घेणार आहोत. या श्रावण महिन्यात तुम्ही या मंदिरांमध्ये नक्की दर्शन घेऊ शकता.

सोमेश्वर मंदिर - सोमेश्वर मंदिर हे पुण्यातील पाषाणमध्ये आहे. हे अत्यंत प्राचीन असे शिवमंदिर असून तब्बल 700-900 वर्षे जुने असल्याचे मानले जाते. हे मंदिर रामनदीच्या काठी वसलेले आहे. तसेच हे स्वयंभू शिवमंदिर आहे. या प्राचीन सोमेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई जिजाबाई भोसले यांनी केला होता. मंदिर परिसरात एका बाजूला बारा ज्योतिलिंर्गांची प्रतिकृती देखील बनवण्यात आली आहे.

बनेश्वर मंदिर - पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यात नसरापूर परिसरात हे मंदिर आहे. या मंदिराची स्थापना पेशवयांच्या काळात झाल्याचे म्हंटले जाते. हे एक पुरातन शिवमंदिर आहे जे निसर्गाच्या सान्निध्यात वसले आहे. या मंदिराच्या परिसरात सुंदर तलाव आहे. आजूबाजूच्या निसर्गरम्य वातावरणामुळे हे मंदिर भाविकांसह पर्यटकांसाठीही विशेष आकर्षण ठरते.

भुलेश्वर मंदिर - पुण्यातील माळशिरसजवळील एका टेकडीवर वसलेले भुलेश्वर मंदिर एक प्राचीन मंदिर आहे. या मंदिराच्या गर्भगृहात पाच शिवलिंगे आहेत. ही शिवलिंगे केवळ सुर्यप्रकाशातच दिसतात. या मंदिरात लक्ष्मी देवी, भगवान विष्णू देखील आहेत. भुलेश्वर शिव मंदिर हे विलक्षण वास्तुकलेसाठीही प्रसिद्ध आहे.

पाताळेश्वर गुंफा मंदिर - पाताळेश्वर हे पुण्यातील जंगली महाराज रोडवर असलेले मंदिर आहे. हे मंदिर एका मोठ्या खडकात कोरलेले असून, ते भगवान शंकराला समर्पित आहे. आठव्या शतकात राष्ट्रकूट राजवटीत हे मंदिर बांधले गेले असे मानले जाते. या गुंफेत राम, सीता, लक्ष्मण, लक्ष्मी आणि गणेश यांच्याही मूर्ती आहेत.

# ठाण्याचे लोकप्रिय खासदार नरेश म्हस्के यांना मानाचा 'संसद रत्न' पुरस्कार प्रदान

**दे**शाची राष्ट्रीय धोरणे, महाराष्ट्र राज्याचे हिताचे विषय आणि ठाणे लोकसभा मतदारसंघातील विकासकामांविषयी संसदेत अभ्यासपूर्व मांडणी करणारे खासदार नरेश म्हस्के यांना यंदाचा मानाचा संसद रत्न' पुरस्कार आज नवी दिल्ली येथे एका विशेष समारंभात केंद्रीय संसदीय कार्यमंत्री तथा अल्पसंख्यांक खात्याचे केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. खासदारकीच्या आपल्या पहिल्याच टर्ममध्ये नरेश मस्के यांना संसद रत्न' पुरस्कार मिळाल्याने नरेश म्हस्के यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.पुरस्कार वितरण सोहळ्याला केंद्रीय कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा असलेल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे (एनसीबीसी) अध्यक्ष हंसराज गंगाराम अहिर, प्राइम पॉइंट फाउंडेशन आणि ई-मॅगझिन प्रेसेन्सचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

खासदार नरेश म्हस्के यांच्यासह महाराष्ट्रातील ७ खासदारांचा संसद रत्न' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. शिवसेना मुख्यनेते आणि महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा भरभक्कम पाठिंबा, शिवसेना गटनेते खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी केलेले मार्गदर्शन, दिलेले प्राधान्य यामुळेच आज हा पुरस्कार मला मिळाला आहे. या दोन्ही नेत्यांसह मला मोठ्या मताधिक्याने संसदेत पाठवणारा मतदार राजा, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी, युवा कार्यकर्ते, माझे शिवसैनिक यांना या पुरस्काराचे मी श्रेय देत असल्याची प्रतिक्रिया नरेश म्हस्के यांनी संसद रत्न पुरस्कार स्विकारल्यानंतर दिली.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या सूचनेनुसार २०१० मध्ये प्राइम पॉइंट फाउंडेशन आणि ई-मॅगझिन प्रेसेन्स यांनी संसद रत्न' पुरस्काराची स्थापना केली. मे २०१० मध्ये चेन्नई येथे झालेल्या पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटन डॉ. कलाम यांनी केले होते.




हे पुरस्कार नागरी समाजाच्या वतीने प्रदान केले जातात. भारतीय विद्यार्थी सेनेपासून नरेश म्हस्के यांचा राजकीय प्रवास सुरु झाला. नगरसेवक, सभागृह नेते, ठाणे महापौर ते ठाणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार असा त्यांचा राजकीय प्रवास वाखाणण्याजोगा आहे. केंद्रीय गृहनिर्माण व नागरी व्यवहार समितीच्या स्थायी समितीचे सदस्य; वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ छाननीसाठी नेमण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीचे (जेपीसी) सदस्य; रेल्वे, प्रवासी जलवाहतूक, शहर सुधारणा आणि गृहनिर्माण समितीचे सदस्य म्हणून खासदार नरेश म्हस्के कामकाज पाहत आहेत. खासदार म्हणून निवडून आल्यानंतर नरेश म्हस्के यांनी लोकसभेत केलेली अभ्यासपूर्ण भाषणे, संसदेतील त्यांची उपस्थिती, विविध केंद्रीय समित्यांवर केलेली कामे यामुळेच त्यांना यंदाचा संसद रत्न' पुरस्कार मिळाला आहे.

# 'मुंबई लोकल' १ ऑगस्टपासून संपूर्ण महाराष्ट्रात सिनेमागृहात




**मुं**बईची वनवाहिनी असलेल्या लोकलच्या प्रवासात झालेल्या नजरानजरेपासून आयुष्य बदलणाऱ्या घटनेपर्यंतचा रंजक प्रवास 'मुंबई लोकल' या चित्रपटातून उलगडणार आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सुप्रसिद्ध अभिनेता, निमार्ता स्वप्निल जोशी यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आला. 'मुंबई लोकलह्व या चित्रपटाचं लेखन, दिग्दर्शन अभिजीत यांनी केलं आहे. बिग ब्रेन प्रॉडक्शन्स, आनंदी एंटरटेनमेंट आणि स्प्लेंडिड प्रॉडक्शन्सने या चित्रपटाची निर्मिती केली असून निलेश राठी, प्राची राऊत, सचिन अग्रवाल आणि तन्वी माहेश्वरी यांनी 'मुंबई लोकल' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. तर त्र्यंबक डागा हे सहनिमार्ते आहेत. प्रथमेश परब, ज्ञानदा रामतीर्थकर ही नवी फ्रेश जोडी प्रमुख भूमिकेत असलेला हा चित्रपट १ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होत आहे.

आयुष्यात प्रत्येक गोष्ट गमावत असलेली ती आणि आयुष्यातली प्रत्येक लढाई हरत असलेला तो 'मुंबई लोकल'च्या प्रवासात एकमेकांना पाहतात. तिथून त्यांची गोष्ट सुरू होते. या प्रवासातच त्यांच्या प्रेमकहाणीला हिरवा सिग्नल मिळतो. पण त्यांच्या आयुष्यात अस काय काय घडतं याची रंजक गोष्ट या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. दोघांमध्ये फुलत जाणाऱ्या नात्याप्रमाणेच चित्रपटाचा ट्रेलर ही हळूहळू उलगडत जातो आणि नक्कीच उत्सुकता वाढवतो . प्रथमेश आणि ज्ञानदा ही फ्रेश जोडी पहिल्यांदाच एकत्र येत असल्याने चित्रपटाला नवा आयाम मिळाला आहे. उत्तम अभिनेत्यांची फौजच या चित्रपटात असल्याने अभिनयाची आघाडी सक्षम आहे. त्याशिवाय लेखन, छायांकन, संगीत अशा सर्वच बाजूंवर हा चित्रपट मजबूत आहे. या सगळ्याचं प्रतिबिंब ट्रेलरमध्ये उमटत आहे. म्हणूनच हा चित्रपट प्रेक्षकांना नक्कीच चित्रपटगृहात आणण्यात यशस्वी ठरणार आहे यात शंका नाही. त्यामुळे लोकल प्रवासात फुलणारी प्रेमाची गोष्ट पाहण्यासाठी आता १ ऑगस्टपर्यंत वाट पहावी लागणार आहे.

'मुंबई लोकल' चित्रपटात अभिनेता प्रथमेश परब आणि अभिनेत्री ज्ञानदा रामतीर्थकर ही जोडी पहिल्यांदाच एकत्र आली असून, मनमीत पेम, पृथ्वीक प्रताप, वनिता खरात, अभिजीत चव्हाण, अनिकेत केळकर, संजय खापरे, संजय कुलकर्णी, स्मिता डोंगरे अशा उत्तम कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटाचे छायांकन योगेश कोळी यांचे असून संकलन स्वप्निल जाधव यांनी केले आहे तर विनोद शिंदे हे क्रिएटिव्ह डिरेक्टर आणि कलादिग्दर्शक डॉ.सुमित पाटील आहेत. चित्रपटातील गाणी गीतकार अभिजीत कुलकर्णी आणि अभिजीत यांची असून देव अँड आशिष, सुचिर कुलकर्णी व हर्षवर्धन वावरे यांनी चित्रपटाचं संगीत दिग्दर्शन केले आहे तर पार्श्वसंगीत समीर सप्तिसकर यांचे आहे. असोसिएट प्रोड्यूसर म्हणून निकुंज मालपाणी यांनी काम पाहिले आहे तर नृत्यदिग्दर्शन राहुल ठोंबरे यांचे आहे.

# शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कार्याध्यक्ष श्री.रामहरी राऊत यांच्या रुग्णसेवेची वर्षपूर्ती



**रा**ऊतसर यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची धुरा, ज्या दिवसापासून हाती घेतली, तेव्हापासून रुग्णसेवेस अधिक चालना मिळाली आहे. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक प्रमुख मा.श्री.मंगेश चिवटेसर यांच्या पावलावर पाऊल टाकत राऊतसरांनी राज्यभर रुग्णसेवेतून लाखो गोरगरीब, गरजू रुग्णांना औषधोपचार उपलब्ध करून दिला आहे. इतकेच नव्हे तर, जिल्ह्या जिल्ह्यात भ्रमण करून त्यांनी वैयक्तिक पातळीवर रुग्णांशी तसेच येथील राजकीय/सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद यात्रा च्या माध्यमातून शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन यांच्या एकूण वैद्यकीय कार्यक्षेत्राची माहिती दिली अन् यासंदर्भात त्यांचे अभिप्राय घेतले.त्याची परिणिती म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची राज्यातल्या गोरगरीब जनतेच्याप्रती असलेली संवेदनशीलता प्रतिबिंबित होते. त्यातून जनसामान्यांच्या मनात शिंदेसाहेब हे आपले खऱ्या अर्थानं आश्रयदाता आहेत, ही भावना निर्माण झाल्याचे निष्पन्न होते.

या वर्षभराच्या काळात त्यांनी राज्याच्या सीमांपर्यंत आपली आरोग्यगंगा पोहोचवून औषधरूपी तीर्थ देत... रुग्णांना जगण्याची नवी उमेद दिली.राऊतसरांच्या नावातच राम अन् हरी ही भगवतांची नावे अंतर्भूत असल्याने त्यांच्या नसा नसात हिंदुत्वाचे भगवे वारे संचारत असल्यामुळे त्यांच्या हातून रुग्णसेवेचं कार्य युद्धपातळीवर होत राहणार, हे सूर्य किरणाएवढं शुभ्र सत्य आहे. राऊतसर यांच्या स्वभावातून साधेपणा, प्रेमळ, मनमिळवू, मितभाषी, कर्तव्यदक्ष, चिकाटी,कठोर परिश्रम अन् लोकसेवेचे दर्शन होते. साधी रहाणी तर उच्च विचारसरणी हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा स्थायीभाव आहे.

एवढा मोठा रुग्णसेवेचा अश्वमेध हाती घेऊन राऊतसरांनी जिल्ह्या जिल्ह्यातील रुग्णसेवकांना बरोबर घेत संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या सूचनेनुसार तर खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णसेवेचीही संवाद यात्रा काढली आहे. केवळ औषधोपचारच नव्हे तर, गोरगरीब, निर्धन रुग्णांचे महागडे ऑपरेशन्स देखील नामवंत हॉस्पिटलमध्ये मोफत वा अल्प दरात यशस्वीरित्या करून दिले. त्यातून रुग्णांमध्ये जगण्याची ऊर्जा निर्माण झाल्याचे दृष्टोत्पत्तीस आले आहे.याचे श्रेय मंगेशसर, राऊतसर अन् राज्यातील ५ हजार रुग्णसेवकांना जाते.

दरम्यान मा.श्री.मंगेश चिवटेसर हे उपमुख्यमंत्र्यांचे ओ एस डी झाल्याने राऊतसरांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली आहे. या महत्वपूर्ण पदाला देखील त्यांनी कठोर परिश्रम घेत न्याय दिला आहे. त्यांना पुढील वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा! आई जगदंबे त्यांना अधिकाधिक रुग्णसेवा करण्याचं बळ देवो,ही चरणी प्रार्थना !!!

**- शुभेच्छक : श्री.रणवीर राजपूत, ठाणे/नंदुरबार. सदस्य,.शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष,.महा.राज्य.**

## " गावचा पोस्टमन "

पूर्वी पोस्टमन जेव्हा तार घेवून यायचा
तेव्हा उरात सर्वांच्या धडकी भरायची
लगबगीन शेतावर जाणारा थांबायचा,
बातमी कोणाच्यातरी मृत्युची ठरायची.

पोस्टमन भाऊ आपली नोकरी करायचा
गावात जाताच आसवांचा कल्लोळ व्हायचा,
झोप लागायची नाही त्यास रात्री,
स्वतःस यमदूत वाटायचे त्यास क्षणोक्षणी,

लिहता वाचता येत नसे कोणा,
कोणतरी म्हणायचे, 'भाऊ तुम्हीच वाचाना'
शब्द वाचताना कंठ त्याचा दाटायचा,
हळूच कोणाचातरी अश्रुचा पाझर फुटायचा,

दुःखाचा डोंगर कोसळला तरी तो,
गेलेल्या गावातून नाही उपाशी परतला,
चावूत भर का होईना,भाकरी खाऊन जायचा,
गावच होत ते, सलाम त्या रीतीला..

**कवी : समर्थ संतोष स्वप्नाली कळंबाटे**
**तळवली, गुहागर, रत्नागिरी**



# श्रावण




**– कल्पना दिलीप म्हापूसकर,**
**मिरा रोड मुंबई**

**श्रा**वणात घननीळा बरसला.....
श्रावण आला ग बनी.......
अश्या विविध अलवार गाण्यांनी स्वरबद्ध झालेला श्रावण महिना म्हणजे सर्व मराठी महिन्यांचा राजाच जणू.

सूयार्ची कोवळी सोनेरी किरण व चंदेरी पावसाच्या सरी. ऊन-सरींचा लपंडाव म्हणजेच श्रावण.

'क्षणात येते सरसर शिरवे
क्षणात फिरूनी ऊन पडे' बालकवींच्या काव्यातील हा श्रावण. आकाशी निरभ्र नभावर पसरलेला इंद्रधनुष्याचा कमनीय पट्टा म्हणजेच श्रावण. श्रावण म्हणजे हिरवळ. पाऊस सुरू झाला की सर्व रान हिरवाई सोबत विविध रंगीत रानफुलानी बहरून येतं. जिथपर्यंत आपली दृष्टी जाईल तिथपर्यंत सर्वच डोळ्याना दिपवून टाकणारे. डोळ्याची पारणे फोडायला लागणारे सृष्टीचे मनोहर सौंदर्य. डोंगरे दरीतून नागीणी सारखी सळसळणारी सरिता. कपारीतून तुषार उडवत वाहत येणारे झरे. हिरवळीवर बुट्टी सारखी उमलून येणारी विविध रंगी मनमोहक रानफुले. या श्रावणातला निसगार्चा स्वर्ग अनुभव म्हणजे कोकण. अवघ्या पृथ्वीवरला स्वर्गच तो आणि त्यात श्रावण महिना म्हणजे अवर्णनीय निसर्ग सौंदर्य, उत्साहाचे झुळझुळ वारे निसगार्चे मनमोहक रूप, मांगल्य-पावित्र्य, सणवार, उपास तापास, व्रतवैकल्ये, एक सोवळेपण. हिंदू धर्मात श्रावण महिन्याला खूप महत्त्व आहे. एक पवित्र महिना म्हणून ओळखला जातो. या महिन्यात प्रामुख्याने सात्विक भोजनाचा विचार केला जातो केस-नखं कापणे निषिद्ध मानले जाते. महिन्यातील दीप पूजन पासून श्रावण सणांना सुरवात होते. या दिवशी घरदार, ठेवणूकीतील भांडीकुंडी सर्व काही घासून पुसून स्वच्छ करून घेतात. ही श्रावण महिन्याच्या आगमनाची तयारीच म्हणायला हरकत नाही.

श्रावण म्हणजे सणवार, गोड धोड जेवणे. श्रावणात महिन्याच्या पाचव्या दिवसापासून जी सणांना सुरवात होते ती नागपंचमी पासून ते थेट गोकुळाष्टमी पर्यंत सण काही संपतच नाहीत. त्यात दर श्रवणी शनिवार, सोमवार एकवेळ जेऊन उपास. जेवणही ठरलेलेच शनिवारी वालाची मोड काढून साली सोलून केलेली उसळ. फक्त जिरे व ओल्या खोबऱ्याचे वाटण. तसेच सोमवारी मुगाची उसळ. कधी सोबत लाल माठ लाल भोपळा घालून केलेला कारण श्रावणात कांदा लसुण व्यर्ज म्हणून . तर कधी अळूवडी. साधारणपणे संध्याकाळी हा एकवेळचे जेवण असलेला उपास सोडल्या जातो. हे उपवासाचे जेवण केळीच्या पानांवर वाढले जाते. नागपंचमीला अळूची पातळ भाजी व मोदक. श्रावणातल्या प्रत्येक शनिवारी नरसय्या पूजला जातो. पुजलेल्या पिंपळाच्या झाडाखाली पडलेले पिंपळाचे पान घेऊन त्यावर सुपारी ठेऊन नरसय्या म्हणून पूजला जातो. भाजणी थालीपीठ नैवेद्य म्हणून दाखवतात. नवविवाहितांच्या मंगळागौर म्हणजे जागरणं. नवपरिणित मंडळींचा उत्सव जणू. मंगळागौरीची पूजा, आरती, नैवेद्य, महिलांचे पारंपरिक खेळ, उदा. झिम्मा, फुगडी, काट वट काना, मिरची का खुर्ची, श्रावण म्हणजे हास्य-मौज-मजा. वैभवशाली कुटुंबातील गाजावाजा.



## चिंब पाऊस.!

चिंब पावसात आज
माझं मस्त आहे राज
वारा आणि जल धारा
उठवी तुफान जरा.

अंग रंग मनी गधं
आल्हाद उडवी केस
मज वाढवी तो साज
निसर्ग खेळीतो रास.

तुफान होईना शांत
जोर धरीते हो चाल
साडी उडवी पदर
वाटे हळदीची शाल.

धुंद झालं मन माझं
वाटे उतरतो साज
सारंच वाऱ्याचं राज
सुसाट वाट हि आज.©®

**कवी : प्रदीप पाटील,**
**गणपूर, जळगाव.**



# राज्याला पुढे नेणे, कोकणचा विकास करणे हे आमचे ध्येय - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**रत्नागिरी :** राज्यातील एकही माणूस उपाशी झोपता कामा नये. एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. राज्यातील एकही माणूस उपचाराविना, औषधाविना मरता कामा नाही. राज्यातील शेतकरी आत्महत्या करता कामा नये. राज्यातील तरुणांच्या हाताला काम मिळाले पाहिजे. हा आपला अजेंडा आहे. सिंधुरत्न योजना सुरु करण्याबाबत आपण मुख्यमंत्र्यांशी बोलू, असे सांगतानाच खेड येथील नाट्यगृहाला दिलेले माँसाहेबांचे नाव हे त्यांना श्रध्दांजली आहे. राज्याला पुढे नेणे, कोकणचा विकास करणे हे आमचे ध्येय आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ



शिंदे यांनी प्रतिपादन केले.

खेड येथील स्व. मिनाताई ठाकरे सांस्कृतिक केंद्र इमारत नुतनीकरण कामाचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. श्री. शिंदे यांनी कोनशिला अनावरण करुन आणि फित कापून तसेच बटन दाबून रंगमंचाचा पडदा उघडून आणि श्रीफळ वाढवून लोकार्पण केले. यावेळी माजी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांचा केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी पालकमंत्री डॉ उदय सामंत, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, माजी पर्यावरण मंत्री रामदास कदम, गृहराज्य मंत्री योगेश कदम, माजी आमदार सदानंद चव्हाण, माजी आमदार संजय कदम, जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नाट्यगृहात येताना बाहेरचे आणि नाट्यगृहाच्या आतील काम पाहिल्यानंतर ते खऱ्या अर्थाने उत्तम प्रकारचे नाट्यगृहाचे काम झाल्याची खात्री देणारे आहे. नाट्यगृहात आतमध्ये आल्यानंतर शहरातील नाट्यगृहात आल्यासारखे वाटते. या नाट्यगृहाला दिलेले माँसाहेबांचे नाव हे त्यांना श्रध्दांजली आहे. रामदास भाई यांच्या संकल्पनेतून आज येथे उभे राहिलेले नाट्यगृह हे मुंबई सारख्या शहरातील नाट्यगृहालाही लाजवेल असे नाट्यगृह आहे. याबद्दल राज्यमंत्री योगेश कदम यांचे मनापासून अभिनंदन करतो. आपण ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकरण असे काम करत असतो. या नाट्यगृहात ३ दिवस नाट्यप्रेमींसाठी मेजवानी आहे.

आपल्याकडे 'नो रिझन, ऑन दि स्पॉट डिसीजन' असे काम केले जाते. त्यामुळे विकासाच्या प्रकल्पांबाबत आपण तात्काळ सही करुन मोकळा होतो आणि त्याचा तात्काळ निधी वर्ग होतो. अडीच वर्ष जे काम केले ते आपल्यासमोर आहे. त्यामुळे अशी नाट्यगृहे उभी राहिली. रस्ते, पाणी अनेक सुविधा आपण देतो. याबरोबरच माणसाच्या धकाधकीच्या जीवनात विरंगुळा म्हणून मनोरंजन व्हायला हवे, त्यामुळे यामध्ये नाट्यगृहांचे खूप महत्त्व आहे. दापोलीत नाट्यगृहासाठी १५ कोटीचा निधी देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.


राज्यातील एकही माणूस उपाशी झोपता कामा नये, एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये, राज्यातील एकही माणूस उपचाराविना, औषधाविना मरता कामा नाही. राज्यातील शेतकरी आत्महत्या करता कामा नये, राज्यातील तरुणाला हाताला काम मिळाले पाहिजे, हा आपला अजेंडा आहे. सिंधुरत्न योजना सुरु करण्याबाबत आपण मुख्यमंत्र्यांशी बोलू, असेही ते म्हणाले. अडीच वर्षात मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून साडेचारशे कोटी रुपये लोकांचे जीव वाचविण्यासाठी आपण दिले. आपण महाराष्ट्रातील जनतेच्या आयुष्यामध्ये सोन्यासारखे दिवस आणण्याचा प्रयत्न करत आहोत. राज्याला पुढे नेणे, कोकणचा विकास करणे हे आमचे ध्येय आहे. पर्यटनाला चालना देण्यासाठी, रोजगार निर्मितीसाठी सरकार काम करत आहे. मुंबई सिंधुदुर्ग एक्सेस कंट्रोल रोड, मुंबई गोवा सागरी महामार्गबाबत काम सुरु आहे, कोकणातील ९ खाड्यांवर पुल बाधण्याबाबतचे काम प्रगतीपथावर आहे. एमएमआरडीच्या धर्तीवर कोकण विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली, त्याला आपण मजबूत करतोय. काजू बोर्ड केले आहे. एमआयडीसीच्या माध्यमातून मोठे प्रकल्प कोकणात येत आहेत, असेही ते म्हणाले.

राज्यमंत्री श्री. कदम यांनी १५ वषार्पासून बंद नाट्यगृहाच्या कामासाठी १३ कोटीचा निधी दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. येथील पाण्याचा प्रश्न मार्गी लागला असून ४८ कोटीची नळपाणी योजना मंजूर झाल्याचे व त्याचे काम सुरु झाल्याची माहिती दिली. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# नवी मुंबईत वाहतूक पोलिसाचा क्रेन खाली येवून मृत्यू; मनसेचा आक्रमक पवित्रा

**नवी मुंबई :** नवी मुंबई येथील महापे भागात कर्तव्यावर असलेले वाहतुक शाखेतील पोलीस हवालदार गणेश पाटील यांचा महापे उड्डाणपुलाखाली वाहतूक नियमन करत असताना क्रेनखाली येऊन मृत्यू झाला. या घटनेनंतर शहरातील अवजड वाहनांच्या सुरू असलेल्या बेदरकारकार वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला असून मनसेने याबाबत आक्रमक पवित्रा घेतला आहे. मनसेच्या शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांची भेट घेऊन अवजड वाहतुक संदर्भात महत्त्वाची मागणी केली आहे.

अवजड वाहने, क्रेन यांच्या



वाहतुकीमुळे नवी मुंबईकरांची डोकेदुखी वाढली आहे. वाहतुक कोंडी, बेदरकारपणे वाहने चालिवणे यामुळे नवी मुंबईकर त्रस्त झाले आहेत. त्यामुळे या अवजड वाहतुकीतून नागरिकांना दिलासा द्यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे. महापे भागात वाहतुक पोलीस हवालदार गणेश पाटील हे २४ जुलैला वाहतुकीचे नियमन करत होते. त्यावेळी एका क्रेनखाली आल्याने त्यांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर नवी मुंबई पोलीस दलात हळहळ व्यक्त केली जात आहे. या संदर्भात मनसे प्रवक्ते व शहराध्यक्ष गजानन काळे आणि मनसे वाहतूक सेना सरचिटणीस नितीन खानविलकर यांच्या नेतृत्वाखाली मनसे शिष्टमंडळाने नेरुळ पूर्व येथील कार्यालयात नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गवांदे यांची भेट घेतली. तसेच, त्यांच्याकडे मागणी केली.

नवी मुंबईतून प्रवास करणारी बहुतांश अवजड वाहने वाहतूक विभागाच्या नियमांचे पालन करत नाही. ट्रक, ट्रेलर, डंपर, क्रेन, कंटेनर सारखी अवजड वाहने सर्रासपणे अतिरिक्त सामान घेऊन वाहतूक करतात. मार्गिकांचे नियम (लेन) आणि वेगमयार्दा यांचे वारंवार उल्लंघन होत असते. एवढी मोठी अवजड वाहने चालक एकटाच चालवत असतो. त्याच्या बरोबर एक मदतनीस असणे आवश्यक आहे. अवजड वाहनांच्या चालकांचे कोणतेही प्रशिक्षण झालेले नसते, चारित्र्य पडताळणी झालेली नसते. हे अपघाताला निमंत्रण देणारे आहे.

शालेय बस ची सुद्धा अशीच दुर्दशा आहे. या बाबतीत वाहतूक विभागाने भरारी पथके नेमून अवजड वाहने, शालेय बस यांच्यावर कारवाई करावी अशी सूचना गजानन काळे यांनी उप प्रादेशिक अधिकारी गजानन गवांदे यांना केली. तसेच नियम न पाळणाऱ्या वाहतूकदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी अधिकाऱ्यांनी लवकर वरील सर्व बाबींवर कारवाई करू असे आश्वासन मनसे शिष्टमंडळाला दिले.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने कायद्यांबाबत साक्षरता कार्यक्रम संपन्न



**रत्नागिरी (जिमाका):** श्रीमती पार्वती शंकर बापट काशिनाथ महाविद्यालय, वाटद खंडाळा येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने विविध कायद्यांबाबत साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव आर. आर. पाटील, महाविद्यालयाचे उपाध्यक्ष श्री. आढाव, सचिव श्री. बोरकर, मुख्याध्यापक श्री. जगताप यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व लोकअभिरक्षक कार्यालयातील वकील उन्मेष मुळ्ये उपस्थित होते.

श्री. पाटील यांनी आपल्या मनोगतात बालकांविषयी असलेल्या कायदेविषयक तरतुदींबाबत विद्यार्थ्यांना अवगत केले. बाल न्यायमंडळ, जिल्हा बालकल्याण समिती यांचे कार्य, विधी संघर्षित बालक, काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक यांविषयी तरतुदींची तसेच बालकांवरील अन्याय, अत्याचार निवारण करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथे बालकांसाठी विधी सेवा पुरविणारे पथक स्थापन झाल्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. अस्पृश्यता निवारणाच्या बाबतीत जातीभेद न पाळण्याचे व धार्मिक विद्वेष न वाढविण्याची जबाबदारी सर्व नागरिकांची असल्याचे कथन केले.

या प्रसंगी ॲड मुळ्ये यांनी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण बालकांबाबतची योजना २०२४ विषयी मुलांना माहिती दिली तसेच बालकांचे हक्क, शिक्षणाचा हक्क, या विषयी मुलांना मार्गदर्शन केले.

# तारापूरमध्ये वाहनतळाअभावी अवजड वाहनांची मुख्य रस्त्यावर बेकायदा पार्किंग

**पालघर :** तारापूर औद्योगिक वसाहतीमधील वाहनतळाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. औद्योगिक वसाहतीमध्ये कायमस्वरूपी वाहनतळ नसल्याने मालवाहू अवजड वाहने मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यावर पार्किंग केली जात असून यामुळे वाहतूक कोंडीसोबतच रस्ते अपघातांचे प्रमाण वाढीस लागले आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांमध्ये मालाची ने-आण करणाऱ्या अवजड वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे.

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाला औद्योगिक क्षेत्राशी जोडणाऱ्या बोईसर चिल्हार राज्यमार्गावरून दिवसभरात जवळपास ६० ते ७० हजार सर्व प्रकारची वाहने ये जा करतात. मात्र औद्योगिक क्षेत्रात कायमस्वरूपी वाहनतळाची सुविधा उपलब्ध नसल्याने बहुतांश अवजड वाहने औद्योगिक क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यांसोबतच, रहिवासी परिसर आणि बोईसर चिल्हार रस्त्यावरील मुकुट टंक ते बिरसा मुंडा चौक, खैरापाडा, बेटेगाव, मान, गुंदले, नागझरी परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूला बेकायदा पार्किंग करून ठेवण्यात येतात. वाहनतळाअभावी अवजड वाहने मुख्य व अंतर्गत रस्त्यावर पार्कींग होत असल्याने वाहतूक कोंडी होऊन त्याचा इतर वाहने, आणि पादचारी यांना त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या अंधारात रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांचा अंदाज न आल्याने अनेक वेळा अपघात होत आहेत. गेल्या आठवड्यात नागझरी येथे रस्त्याच्या बाजूला पार्किंग करून ठेवलेल्या ट्रकला धडकून अपघात होऊन पीकअप जीपचा चालक आणि सहप्रवाशाचा दुदैर्वी मृत्यू झाला होता. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील बोईसर पालघर रस्त्याशेजारील एएम-३७ हा २३०४८ स्क्वेयर मीटर क्षेत्रफळाचा भूखंड ट्रक टर्मिनलसाठी आरक्षित आहे.

मात्र ट्रक टर्मिनलसाठी आरक्षित असलेल्या या भूखंडावर अनधीकृत झोपड्यांचे अतिक्रमण झाले असून बोईसर रेल्वे स्टेशन परिसर जवळच असल्याने वाहनांच्या गदीर्मुळे हा भूखंड अवजड वाहनांच्या पार्किंगसाठी गैरसोयीचा ठरून वापराविना तसाच पडून आहे. बोईसर पालघर रस्त्याशेजारील वाहनतळासाठी राखीव असलेल्या भूखंडाचे आरक्षण बदलून तारापूर औदयोगिक वसाहतीमधील बॉम्बे रेयॉन कंपनीसमोरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मालकीचा सेवा सुविधांसाठी आरक्षित असलेला ओएस-१/ए हा २२२३४ स्क्वेअर मीटर क्षेत्रफळाचा भूखंड हा वापराविना पडून आहे. औद्योगिक वसाहतीच्या मध्यभागी असल्याने हा भूखंड अवजड वाहनांच्या पार्किंगसाठी सोयीचा ठरणार असून भूखंड क्रमांक ओएस-१/ए या भूखंडाचे सोयीसुविधांसाठी हे आरक्षण बदलून त्या ठिकाणी वाहनतळाचे आरक्षण करण्याचा प्रस्ताव एमआयडीसीच्या वरिष्ठ कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. या ठिकाणी ट्रक टर्मिनलसोबतच वाहनांचे चालक आणि वाहक यांच्याकरीता विश्रांतीगृह, उपहारगृह आणि शौचालयाची सुविधा निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

# महाड एमआयडीसी पोलिसांनी केले ८८.९२ कोटी किंमतीचे केटामाईन जप्त!

**महाड :** महाड औद्योगिक वसाहतीतील रोहन केमिकल्स कंपनीच्या महाड औद्योगिक वसाहत ठाण्याचे पोलिस व अंमली पदार्थ नियंत्रण विभाग (NCB) यांच्या संयुक्त कारवाईतून सुमारे ८८.९२ कोटी किंमतीचा किटामाईन अमली पदार्थ जप्त करण्याची कारवाई झाली असली तरी अजूनही काही कंपन्या संशयाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता औद्योगिक वसाहतीमधील कामगारांमध्ये चर्चिली जात आहे.



महाड औद्योगिक वसाहतीत पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून महाड एमआयडीसीतील प्लॉट नंबर.ए.२६/३ या प्लॉटमध्ये रोहन केमिकल कंपनी कार्यरत असून कंपनीच्या प्रांगणात सुरू असलेल्या बेकायदेशीर रसायन प्रक्रियेवर कारवाई करण्यात आली. या ठिकाणाहून ३४ किलो किटामाईन पावडर आणि १३ किलो लिक्विड किटामाईन असा एकूण साठा जप्त करण्यात आला.

या युनिटचा वापर कायदेशीर उत्पादनाऐवजी अमली पदार्थ निर्मितीसाठी केला जात असल्याचे प्राथमिक तपासातून उघड झाले आहे. या बेकायदेशीर व्यवहारात अनेक व्यक्ती तसेच लहान रासायनिक युनिट्स सामील असल्याचा संशय असून, याप्रकरणी मच्छिंद्र भोसले राहणार जिते तालुका महाड, सुशांत पाटील राहणार मोहप्रे तालुका महाड, शुभम सुतार राहणार . पाचगाव तालुका करवीर जिल्हा कोल्हापूर ,व रोहन गवस राहणार ५०१ मार्बल आर्च मित्तल कॉलेज जवळ चिंचोली बंदर मालाड वेस्ट मुंबई यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

या प्रकरणी अंमली पदार्थ प्रतिबंधक कायदा १९८५ (NDPS Act) अंतर्गत८(c) २२(c) २५,२७,(Ô) २९,४२ बी एन एस २०२३ चे कलम३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईबाबत कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी कारवाई पथकाचे अभिनंदन केले आहे.

# वसई विरार महापालिकेचे तत्कालीन आयुक्त अनिलकुमार पवारांच्या घरी ईडीची कारवाई



**वसई :** वसई विरार महापालिकेचे तत्कालीन आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यावर मंगळवार सकाळपासून सक्तवसुली संचलनालयाची कारवाई सुरू झाली आहे. वसईच्या दिनदयाळ नगर येथील शासकीय बंगल्यात तसेच अन्य १२ ठिकाणी ही कारवाई झाली आहे.

अनिलकुमार पवार हे जानेवारी २०२२ पासून वसई विरार महापालिकेचे आयुक्त तसेच प्रशासक म्हणून कार्यरत होते. नुकतीच त्यांची मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी ठाणे येथे बदली झाली होती. बदलीनंतरही ते आठवडाभर पालिकेत कार्यरत होते.

सोमवारी त्यांचा महापालिकेच्या मुख्यालयात छोटेखानी निरोप समारंभ पार पडला होता. मात्र या निरोप समारंभाच्या अगदी दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर ईडीची कारवाई झाली आहे. त्यांच्या वसईतील दिनदयाळ नगर येथील शासकीय बंगला तसेच मुंबई, नाशिक मधील मधील १२ ठिकाणांवर कारवाई सुरू आहे. खुद्द पालिकेचे माजी आयुक्तच ईडीच्या रडारवर आल्याने वसईत खळबळ उडाली आहे. माजी नगरसेवक धनंजय गावडे यांनी केलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे.

मे महिन्यापासू ईडीच्या कारवाईचे सत्र सुरू आहे. पालिकेचे निलंबित नगररचना उपसंचालक वाय एस रेड्डी यांच्या हैद्राबाद येथील निवासस्थानी छापे टाकून कोट्यवंधींचे घबाड जप्त करण्यात आले होते. त्यापाठोपाठ बडे व्यावसायिक, सनदी लेखापाला, वास्तुविषारद आदींवर कारवाई झाली होती.

# नायशी विद्यालयात आश्रयदाते ह.भ.प. आ.बा. सावंत पुण्यतिथी आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार

**लोटे :** ह.भ.प. श्री.आ.बा सावंत माध्यमिक विद्यालय नायशी येथे 27 जुलै 2025 रोजी, विद्यालयाचे आश्रयदाते, तोंडली गावचे सुपुत्र, हरिभक्त परायण वैकुंठवासी, आत्माराम बापूजी सावंत यांची 33 वी पुण्यतिथी अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडली. या पुण्यतिथीनिमित्त गुणवंत विद्यार्थी सत्कार व सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी उपस्थित संस्था पदाधिकारी,प्रमुख पाहुणे, प्रतिष्ठित मान्यवर यांच्या हस्ते, दीप प्रज्वलनाने, आ.बा सावंत यांच्या प्रतिमेचे पूजन व तुळशीहार व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. तर शाळेचे मुख्याध्यापक- आनंदा घाटगे यांनी त्यांच्या जीवनकायार्चा आढावा आपल्या भाषणात व्यक्त केला.

यानंतर त्यांच्या स्मरणार्थ सावंत परिवार व त्यांचे जेष्ठ पुत्र हरिभक्त-हरिश्चंद्र सावंत यांच्याकडून प्रतिवर्षी प्रमाणे, विद्यालयातून इयत्ता 10/12वी वगार्तून प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यात इयत्ता 10वीतून प्रथम-कीर्ती बळीराम घाग, द्वितीय- अथर्व संतोष पवार, तृतीय- अथर्व



मधुकर चव्हाण, तर इ.12वी तून प्रथम-आर्यन राजेंद्र लाड, द्वितीय-मंजिरी एकनाथ कदम, तृतीय-सलोनी सुभाष कदम, या विद्यार्थ्यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

तर विशेष प्राविण्याने इ.5वी स्कॉलरशिप परीक्षेत जिल्हा गुणवत्तायादीत-115 वा, तर चिपळूण तालुका स्तरावर-11वा क्रमांक प्राप्त करणारी कु.शुभ्रा मिलिंद आंबवकर हिचा सन्मान, संस्थेचे अध्यक्ष- सुमित चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला.

यानंतर विशेष सन्मान मूर्ती, संस्थेचे माजी अध्यक्ष कै. रमेश परशुराम घाग यांचे सुपुत्र-चिराग रमेश घाग यांची गुहागर पंचायत समिती येथे 'सांख्यिकी या पदावर विस्तार अधिकारी' म्हणून निवड झाल्याबद्दल, विद्यालयाचे हितचिंतक श्री.संजय कदम यांच्या हस्ते सन्मान झाला. तसेच गुहागर येथे ग्रामसेवक या पदावर कार्यरत असलेल्या, सौ. योगिता घाग यांचा सन्मान, रज्जाकशेठ मुल्लाजी यांच्या हस्ते संपन्न झाला.

या कार्यक्रम प्रसंगी संस्थाध्यक्ष- सुमित चव्हाण, उपाध्यक्ष-सुरेश आग्रे, सचिव-रुपेश गोसावी, संचालक- श्रीधर शेठ घाग, किशोर कदम, दत्ताराम झगडे, प्रमुख पाहुणे-संजय कदम, रज्जाक शेठ मुल्लाजी तसेच प्रतिष्ठित मान्यवर-मोहनराव घाग, कृष्णाजी चव्हाण, नायशीचे सरपंच-सौ ऋतिका जाधव, उत्तम देसाई, सौ. एकता कदम, तसेच माजी संचालक-प्रवीण खांडेकर, दिलीप कातकर, कस्तुरी घाग, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी त्याचबरोबर पालक व माजी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश माळी यांनी केले. तर सर्व उपस्थितांचे आभार सुरेश गवळी यांनी मानले. शेवटी गुणवंत सत्कार मूर्ती कडून विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना पेढा व अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# छप्परावर प्लास्टिक टाकण्यासाठी गेलेल्या १७ वर्षीय तरुणाचा विजेच्या धक्क्याने मृत्यु

**उल्हासनगर:** पावसानंतर छत गळत असल्याने गळके छत दुरूस्त करण्यासाठी अनेक कुटुंबे छतावर प्लास्टिक किंवा टारपोलिन टाकतात. मात्र घराचे गळके छप्पर दुरूस्त करण्यासाठी गेलेल्या एका १७ वर्षीय तरूणाला विजेचा जोरदार धक्का बसला. यात या तरूणाचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेने उल्हासनगरच्या शास्त्री नगर परिसरात हळहळ व्यक्त होते आहे. आयुष रॉय असे या तरूणाचे नाव असून तो वडिलांसोबत छतावर गेला होता.



उल्हासनगर अत्यंत दाटीवाटीचे शहर म्हणून ओळखले जाते. शहरातील मोठ्या भागात चाळवजा घरांची संख्या अधिक आहे. यातील अनेक घरांवर पावसाळ्यात पत्रे गळके होतात. त्यामुळे या घरांवर प्लास्टीकचे आवरण किंवा टारपोलीन टाकण्याला पसंती दिली जाते. पावसाळाच्या सुरूवातीला हे आवरण टाकले जाते. मात्र यंदा मे महिन्यातच पावसाला सुरूवात झाली. त्यामुळे अनेक घरांवर हे आवरण टाकायचे राहून गेले होते. अशाच एका घटनेत छतावर आवरण टाकताना एका १७ वर्षीय तरूणाला आपला जीव गमवावा लागला आहे. उल्हासनगर कॅम्प २ येथील शास्त्रीनगर परिसरात पंजाबी कॉलनीमध्ये सोमवारी ही दुर्दैवी घटना घडली. १७ वर्षीय आयुष रॉय हा आपल्या वडिलांसोबत घराच्या गळक्या छतावर प्लास्टिक टाकण्यासाठी गेला होता. तेव्हा त्याचा संपर्क उघड्या विजेच्या तारांशी झाला. त्यामुळे त्याला तीव्र स्वरूपाचा विजेचा धक्का बसला. तिथे जागीच आयुष बेशुद्ध होऊन पडला. त्यानंतर त्याला तातडीने उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर कुटुंबीयांसह स्थानिक नागरिकांनी महावितरणाच्या निष्काळजीपणावर बोट ठेवले आहे. छतावरून गेलेल्या उघड्या विजेच्या तारांविषयी यापूर्वीच महावितरणकडे तक्रार केली होती. मात्र, त्या तक्रारीची दखल घेतली गेली नाही, अशी माहिती आयुषच्या कुटुंबियांनी दिली आहे. कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी पाहणीसाठी घटनास्थळी आला नव्हता. याच निष्काळजीपणामुळे एका निष्पाप तरूणाला बळी गेला, असा संताप नागरिकांनी व्यक्त केला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जाते आहे. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी आता केली जाते आहे. या प्रकरणात वेळीच कारवाई केली नाही तर प्रशासनाविरोधात आंदोलन केले जाईल, असा इशारा स्थानिकांच्या वतीने देण्यात आला आहे. या घटनेनंतर तरी उघड्या वीज वाहिन्यांची दुरूस्ती केली जाईल का, असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे.

# मच्छिमारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारा विकास - मत्स्यव्यवसाय बंदरे विकासमंत्री नितेश राणे

# मिरकरवाडा बंदराच्या दुसऱ्या टप्प्याच्या विकास प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न

**■रत्नागिरी :** 'मच्छीमार बांधवांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि कोकण किनारपट्टीचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी आम्ही अतिक्रमणासारख्या कठोर निर्णयांचीही भीती बाळगली नाही. आता या बंदराच्या आणि पयाऱ्याने इथल्या मच्छिमारांच्या विकासासाठी चांगल्या दजार्ची कामे केली जातील असा विश्वास मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला. तर, मिरकरवाडा बंदर विकासासाठी आणखी ३६ कोटींचा प्रस्ताव तयार असल्याचे पालकमंत्री डॉ उदय सामंत यांनी सांगितले.

मिरकरवाडा बंदराच्या दुसऱ्या टप्प्याच्या विकास प्रकल्पाचे भूमिपूजन दि.२७ रोजी झाले. यावेळी मत्स्य विकास आयुक्त किशोर तावडे, माजी नगराध्यक्ष बंड्या साळवी, माजी जि.प. सदस्य बाबू म्हाप आदी उपस्थित होते.

बंदरेमंत्री श्री राणे म्हणाले, आम्ही कोकण किनारपट्टीच्या सशक्तीकरणाच्यादृष्टीने पावले टाकायला सुरुवात केली. त्यामध्ये मिरकरवाडा बंदराचा विकास आमच्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा होता. मात्र, इथे अतिक्रमणाच्या अडचणी समोर आल्या. काहींनी आमच्याबद्दल तीव्र गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न केला. पण, आम्ही ठाम राहिलो




आणि त्यामुळेच आजचा दिवस उजाडला आहे.

प्रत्येक नागरिकाचे भविष्य घडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. दुसऱ्या टप्प्यात विविध विकासकामांचा समावेश असून, बंदराची कार्यक्षमता वाढवण्यासाठी साठवण क्षमता, बर्फ कारखाने, सांडपाणी व्यवस्था, मासेमारीची यंत्रणा आणि इतर सोयी सुविधा यांचा समावेश आहे.

इथले अतिक्रमण हटवताना पालकमंत्री डॉ सामंत यांनी



केलेल्या सहकायार्चा आवर्जून उल्लेख करत त्यांचे या विकास प्रक्रियेकडे लक्ष असून लवकरच तिसऱ्या टप्प्यातील विकासासाठी सज्ज राहणार आहोत असे ते म्हणाले. 'आजचा हा विकासदृष्टीकोन मच्छीमार समाजाच्या भविष्यासाठी महत्त्वाचा आहे,' असेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री डॉ सामंत म्हणाले, मिरकरवाड्याचा विकास व्हावा, यासाठी गेली वीस वर्षे झगडतोय. पण, तो होण्यासाठी कोकणच्या सुपुत्रालाच मंत्री व्हावं लागलं. या बंदराच्या विकासासाठी २२ कोटींचा पहिला टप्पा सुरू झाला असून, ३६ कोटींचा आराखडा विभागाने तयार केला आहे. यातूनच इथल्या मच्छीमारांना समृद्धीची नवी दिशा मिळणार आहे. मंत्री श्री राणे यांनी या बंदर विकासाचा संकल्प केला. त्यांच्यामुळेच आज मच्छीला कृषीचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे मिरकरवाडा भविष्यात राज्यातील सर्वाधिक उत्पन्न देणारे बंदर ठरेल, याचा मला विश्वास आहे. त्याच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. अशावेळी अवैध मासेमारीला आळा घालतानाच आमचा छोटा मच्छीमारही मोठ्या मच्छीमारासारखाच जगला पाहिजे. हीच आमची भूमिका आहे. असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, कोकणचा सुपुत्र मत्स्य व्यवसायासाठी जीव ओतून काम करतो, हे कोकणासाठी भाग्य आहे. नाटे आणि हरणे बंदरासाठी २०० कोटींचा निधी मंजूर झाला असून, भविष्यात मिरकरवाडा मलपीपेक्षा मोठं बंदर होईल यात दुमत नाही. त्यामुळेच माझ्या मतदारसंघात होणाऱ्या मत्स्य विकासासाठी, मच्छीमारांचं भवितव्य घडवण्यासाठी माझे नेहमीच सहकार्य असेल, असेही ते म्हणाले

## चिपळूणमध्ये 'होम मिनिस्टर' स्पर्धेतून स्वच्छतेचा संदेश, १२ दिवसांत ४३७ किलो प्लास्टिक संकलन

**■चिपळूण (विशाल ढोबळे) :** चिपळूण शहर स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिकमुक्त करण्याच्या उद्देशाने नगर परिषदेचे मुख्याधिकारी विशाल भोसले यांनी घेतलेला पुढाकार आता शहरातील महिलांच्या सक्रिय सहभागामुळे अधिक प्रभावी ठरत आहे. सह्याद्री निसर्ग मित्र संस्था आणि नाटक कंपनी चिपळूण यांच्या संयुक्त विद्यमाने 'होम मिनिस्टर' ही महिलांसाठी विशेष स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

१५ जुलैपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत आजपर्यंत १७८ महिलांनी सहभाग नोंदवला असून केवळ १२ दिवसांत तब्बल ४३७ किलो प्लास्टिक संकलित करण्यात आले आहे. हा उपक्रम १५ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. महिलांच्या या सहभागीवृत्तीमुळे शहरात स्वच्छतेची लाट उसळली असून, पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक ठोस पाऊल पडले आहे.

या स्पर्धेतील संकल्पना अतिशय अभिनव आहे. महिनाभरात किमान १५ दिवस प्लास्टिक संकलन करणाऱ्या महिलांना विशेष कूपन्स देण्यात येत असून, त्यातून लकी ड्रॉद्वारे एक भाग्यवान महिला 'सोन्याची नथ' जिंकेल. याशिवाय, १५ ऑगस्टनंतर सेलिब्रिटींच्या उपस्थितीत होणाऱ्या 'होम मिनिस्टर' स्पर्धेतून दुसऱ्या एका विजेत्या महिलेला 'पैठणी' प्रदान केली जाणार आहे. अशा प्रकारे स्वच्छतेच्या कार्यात महिला सहभागी होत असतानाच त्यांच्या कायाचर्ची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्याचा प्रयत्न ही या उपक्रमातून होत आहे.

या मोहिमेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, अभिनेता ओंकार भोजने यांची 'स्वच्छतेचे दूत' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आणि प्रत्यक्ष भेटीद्वारे महिलांना या उपक्रमात सामील होण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. यामुळे या अभियानाला अधिक व्यापक पोहोच मिळाली आहे.

सह्याद्री निसर्ग मित्र संस्थेचे संचालक भाऊ काटदरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संपूर्ण उपक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध आणि काटेकोरपणे केले आहे. महिलांनी घरातील प्लास्टिक गोळा केल्यानंतर फक्त एक संदेश दिला की संस्था कार्यकर्ते त्यांच्या घरी जाऊन प्लास्टिक उचलतात, इतका सुटसुटीत आणि प्रभावी हा उपक्रम आहे.

या उपक्रमामुळे महिलांना केवळ बक्षिसे जिंकण्याची संधी मिळत नाही, तर त्यांना समाजासाठी काहीतरी चांगले करण्याचे समाधानही लाभते आहे. त्यांच्या पुढाकारामुळे चिपळूण शहरात स्वच्छतेविषयी जनजागृती होत आहे, पर्यावरणविषयक भान निर्माण होत आहे आणि समाजात सकारात्मक ऊर्जा रुजत आहे. या उपक्रमात सहभागी होण्याची संधी अजूनही महिलांसाठी खुली आहे. इच्छुक महिलांनी ७२७६०४१७०१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन चिपळूण नगर परिषद आणि आयोजक संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## विनती ऑरगॅनिक लिमिटेड कंपनीमधील कामगार सुरक्षा नियमांच्या निष्काळजीपणामुळे कामगाराचा दुर्दैवी मृत्यू






**■रत्नागिरी (राधा लवेकर) :** मुंबई गोवा महामार्गावरील खेड येथील लोटे एमआयडीसी मधील विनती ऑरगॅनिक लिमिटेड कंपनी मधील कामगार सुरक्षा नियमांकडे झालेल्या निष्काळजीपणामुळे एका कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. २६ जुलै रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास घडलेल्या या अपघातात समीर खेडेकर रा.घाणेखुंट ह्या स्थानिक कामगाराचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणात खेड पोलिसांनी कंपनीचे मालक विनोद सराफ, मॅनेजर महादेव महिमान, सुरक्षा अधिकारी सुरेंद्र जाधव, आणि प्लांट इन्चार्ज जयंत भगत यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ च्या कलम १०६, १२५, ३ आणि ५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

पोलिसांच्या प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे की, कंपनीत कामगार सुरक्षेच्या कोणत्याही आवश्यक उपाययोजना केल्या नव्हत्या. सुरक्षा उपकरणांची अनुपलब्धता, नियमित तपासणीचा अभाव, आणि प्रशिक्षणाच्या तुटवड्यामुळे हे भीषण अपघात घडल्याचे निष्पन्न झाले आहे. या घटनेमुळे औद्योगिक क्षेत्रात एकच खळबळ उडाली असून, कामगार संघटनांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मृत समीर खेडेकर यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, योग्य नुकसानभरपाई आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक पातळीवरून होत आहे. दरम्यान, खेड पोलिसांनी चौघा आरोपींना नोटीस बजावून पुढील चौकशी सुरू केली असून, कंपनीमध्ये सुरक्षा उपायांची पाहणी करून तपशीलवार अहवाल तयार केला जात आहे. औद्योगिक सुरक्षेच्या नावाखाली होणारा हा गोंधळ आणि निष्काळजीपणा कामगारांच्या जीवावर उठतोय, ही बाब अत्यंत गंभीर असून प्रशासनाने याची तातडीने दखल घेणे गरजेचे असल्याचे सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिकांनी म्हटले आहे.

## भाजपाच्यावतीने काताळे-पडवे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील ९ शाळांमधील २८५ विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

### मुख्यमंत्री सन्मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने माजी तालुकाध्यक्ष निलेश सुर्वे यांचा शैक्षणिक उपक्रम

**■गुहागर :** महाराष्ट्र राज्याचे लाडके, कार्यकुशल, कार्यसम्राट मुख्यमंत्री सन्मा. देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस २२ जुलै रोजी साजरा होतो. प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही हा वाढदिवस कोणतीही जाहिरात अथवा प्रसिद्धीचे कार्यक्रम न करता शैक्षणिक साहित्याचे वाटप किंवा मुख्यमंत्री सहाय्यता निधीला आर्थिक सहकार्य करून करण्याचे आवाहन आदरणीय देवेंद्रजींनी केले होते, त्यानुसार गुहागर तालुका भारतीय जनता पाटीर्चे माजी अध्यक्ष निलेश सुर्वे यांनी पडवे आणि काताळे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद आदर्श शाळा तवसाळ नं १, तवसाळ अंगणवाडी, तांबडवाडी शाळा, बाबरवाडी शाळा, माध्यमिक विद्यालय पडवे, पडवे मराठी शाळा, काताळे शाळा नं.१, काताळे नवानगर शाळा,काताळे



**महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री सन्मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवानिमित्ताने जि.प.आदर्श शाळा तवसाळ नं.१ येथे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करताना भाजपा माजी तालुकाध्यक्ष निलेश सुर्वे, काताळे ग्रामपंचायत सरपंच सौ प्रियंका सुर्वे, तालुका उपाध्यक्ष विनायक सुर्वे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जगदीश गडदे, भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते राजेश सुर्वे सहशिक्षक राठोड सर**

नवानगर उर्दु शाळा, केंद्रीय शाळा पडवे उर्दु या ९ शाळांमधील २८५ विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप केले.

भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष निलेश सुर्वे यांनी या ९ शाळांमध्ये प्रत्यक्ष जाऊन मुख्यमंत्री सन्मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्ताने या उपक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी काताळे ग्रामपंचायत सरपंच सौ प्रियांका निलेश सुर्वे, पडवे ग्रामपंचायत सरपंच मुजीफ जांभारकर, तवसाळ शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जगदीश गडदे, भाजपाचे तालुका उपाध्यक्ष विनायक सुर्वे, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते राजेश सुर्वे, पडवेचे विनायक भोसले, काताळे ग्रामपंचायत सदस्य मधुकर अजगोलकर, जैद भाटकर, माजी ग्रामपंचायत सदस्य लैबर जांभारकर, अंगणवाडी सेविका श्रीमती छाया सुर्वे, मदतनीस श्रीमती मनीषा मयेकर याच बरोबर जि. प.आदर्श शाळा तवसाळ नंबर १ चे राठोड सर, काताळे शाळा नंबर १ च्या मुख्याध्यापिका माधवी पाटील मॅडम, कांबळे सर, नवानगरचे गुरसुळे सर, पडवे शाळेचे पावरी सर, संजय राठोड सर, तवसाळ बाबरवाडी शाळेचे कोकाटे सर, तवसाळ तांबडवाडी शाळेचे संदीप भोई सर, साईनाथ पुजारा सर, पडवे माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.बी. सूर्यवंशी, सहशिक्षक पी. जी. वेलुंडे, एस.एम.सूर्यवंशी, लिपिक राहुल कांबळे, प्रशांत सुर्वे, काताळे नवानगर उर्दूच्या मुख्याध्यापिका शाहीन मॅडम, उपशिक्षिका उजवा मॅडम, पडवे उर्दू केंद्राचे केंद्रप्रमुख परवेज अ.रशिद चिपळूणकर, मुख्याध्यापक महमद सलीम अजगर कारभारी, सह शिक्षक रमजान फुरकान जांभारकर, दाऊद साहेब हमीद जांभारकर, शिक्षण सेविका जुलेखा इरफान हातवडकर, रुखसार या.गनि मेमन आदींसह बहुसंख्य ग्रामस्थ या वह्या वाटपाच्या वेळी उपस्थित होते.

माजी तालुकाध्यक्ष निलेश सुर्वे यांच्या या स्तुत्य उपक्रमासाठी पदवीधर मतदारसंघाचे आमदार सन्मा.निरंजन जी डावखरे साहेब यांचे विशेष सहकार्य लाभले. काताळे आणि पडवे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील ९ शाळांना एकाच दिवशी शालोपयोगी वस्तू विद्यार्थ्यांना देण्याचा उपक्रम हा पहिल्यांदाच राबविला गेला असून तो निलेश सुर्वे यांनी राबविला याबद्दल सर्व शिक्षक वृंद आणि या दोन्ही ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामस्थांकडून निलेश सुर्वे यांचे कौतुक आणि आभारही व्यक्त केले जात आहे. रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य म्हणून काम करत असताना आपल्या परिसरात अनेक विषयांसाठी निधी खर्ची पाडणाऱ्या निलेश सुर्वे यांनी यावेळी या शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल त्यांना दोन्ही ग्रामपंचायतीच्या वतीने धन्यवाद देण्यात आले आहेत.

## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी घेताहेत जपानी, जर्मन भाषेचे धडे




**■नाशिक :** एकीकडे खासगी शाळांच्या स्पर्धेत जिल्हा परिषदेच्या शाळा मागे पडत असताना नाशिकमधील अंदरसुलची शाळा मात्र याला अपवाद ठरली आहे. नाशिकच्या येवला तालुक्यातील अंदरसुल इथली जिल्हा परिषद शाळेतील मुली चक्क जपानी आणि जर्मन भाषेतून बोलतात. राज्यात हिंदीभाषेवरुन रान पेटलंय.. असं असताना जागतिक स्पर्धेत आपले विद्यार्थी पुढे जावेत यासाठी अंदरसुलच्या शाळेतील शिक्षकांनी मराठी, इंग्रजी आणि हिंदीसोबतच मुलांना जपानी आणि जर्मन भाषाही शिकवण्यास सुरुवात केली आहे. इथल्या मुली आलेल्या प्रत्येकाचं स्वागत जपानी आणि जर्मन भाषेत करतात.

विशेष म्हणजे, शाळेतील मुली पाहुण्यांचे स्वागत जपानी आणि जर्मन भाषेत करतात, ज्यामुळे शाळेचा दर्जा आणि विद्यार्थ्यांची आत्मविश्वासपूर्ण उपस्थिती अधोरेखित होते. या उपक्रमाचे कौतुक मंत्री छगन भुजबळ यांनीही केले असून त्यांनी विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यासह कोडिंग आणि ॲप डेव्हलपमेंट सादरीकरणाचेही अभिनंदन केले. इयत्ता चौथीतील विद्यार्थिनीने २७ अंकी आकड्यांचे वाचन करून उपस्थितांना आश्चर्यचकित केले. ही शाळा ग्रामीण भागात असूनही आधुनिक शिक्षणाच्या दिशेने पाऊल टाकत आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय संधी, विदेशी शिक्षण, आणि नवीन करिअर पर्याय उपलब्ध होण्याची शक्यता वाढते.

## पुण्यातील एका कथित चित्रपट निर्मात्यास पिंपरी चिंचवड सायबर पोलिसांनी केली अटक



**■पुणे :** चिनी नागरिकांच्या सांगण्यावरून बँक खाते उघडून सायबर फसवणूक करण्यास मदत करणाऱ्या पुण्यातील एका कथित चित्रपट निर्मात्यास पिंपरी चिंचवड सायबर पोलिसांनी अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या कथित निर्मात्याने आतापर्यंत ८६ लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झालं आहे. त्याच्याकडून काही कागदपत्रे देखील ताब्यात घेतली आहेत. शिवम बाळकृष्ण संवतसरकार अस अटक करण्यात आलेल्या आरोपी निर्मात्याचे नाव आहे. तो पुण्याचा रहिवासी आहे.

शिवम संवतसरकार याने चीन देशातील बॉम्बिनी या नागरिकाशी थेट संपर्कात राहून बालाजी इंटरप्राइजेस या नावाने बँक खाते सुरू केले होते. या बँक खात्याचा उपयोग तो फसवणुकीच्या गुन्ह्यात वापरले आहेत. या खात्यावर आतापर्यंत ८६ लाख ४३ हजार १११ रुपये जमा झाल्याचं समोर आलं असून या बँक खात्यासंदर्भात १५ पेक्षा अधिक फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपीकडे आणखी दोन बँक खाती त्याच्या मोबाईलमध्ये असल्याचं समोर आलं असून पोलिसांनी दोन मोबाइल फोन देखील जप्त केले आहेत, अधिक तपास सायबर पोलीस करत आहेत.

## रस्त्याच्या बाजूच्या मोकळ्या जागेत बसण्यावरून दोन विक्रेत्यांमध्ये मारहाण

### चिपळूण नगरपरिषदेने विक्रेत्यांवर उगारला कारवाईचा बडगा



**■चिपळूण (श्रीकांत कांबळी) :** चिपळूण मध्यवर्ती बस स्थानकाच्या बाहेर बसणाऱ्या दोन विक्रेत्यांमध्ये रस्त्याच्या बाजूच्या मोकळ्या जागेत बसण्यावरून जोरात मारहाण झाली. काही महिन्यांपूर्वी चिपळूण नगरपरिषदेने रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा होत असल्याने रस्त्यालगत बसणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर काही दिवस रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला. पण काही दिवसातच विक्रेत्यांनी पुन्हा काही जागेवर बस्तान मांडायला सुरुवात केलीत्यामुळे जागेवरून आपापसात मारामारी झाल्याचा प्रकार उघडकीस आल्याने नगर परिषदेने सर्व विक्रेत्यांवर पुन्हा एकदा कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. तसेच काही की नगर परिषदेने अशा मोकळ्या जागेत छोटी छोटी झाडे लावून त्या जागी सुशोभीकरण करून सुंदर असे चिपळूण शहर घडवावे अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

Printed by Somani Printing Press Published by Yogesh Raghuveer holamb on behalf of Yogesh Raghuveer holamb, printed at Mumbai Suburban and published at 8, Agavane Chawl No-1, Pipe Line, Jawahar Nagar, Khar (E), Mumbai. Editor : Yogesh Raghuveer holamb.